बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)



बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ४० | बुधवार,दि.८ सप्टेंबर २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021

# बाघनदीच्या पात्रात कालीमाटीची चार मुले बुडाले

**गोंदियाः** आमगाव तालुक्यातील कालीमाटी येथील वाघ नदीपात्रात चार युवक वाहून गेल्याची घटना आज मंगळवार, ७ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडली. संतोष अशोक बहेकार (१९), रोहित नंदकिशोर बहेकार (१८) मयूर अशोक खोब्रागडे (२१), सुमित दिलीप शेंडे (१६) सर्व रा. कालीमाटी ता. आमगाव अशी वाहून गेलेल्यांची नावे आहेत. वृत्त लिहीपर्यंत खलाशी व आपत्ती व्यवस्थापन पथकाकडून शोधकार्य सुरूहोते.

सकाळच्या सुमारास संतोष बहेकार, रोहित बहेकार, मयुर खोब्रागडे, सुमित शेंडे, कार्तिक दोनोडे, विशाल मेंढे व रोहित फुंडे हे सात मित्र मार्बत विसर्जनाकरिता वाघ नदीच्या मुंडीपार येथील घुबडघाट काठावर गेले होते. दरम्यान सातही मित्रांनी नदीपात्रात आंघोळीचा बेत आखला. परंतु हा बेत चार मित्रांच्या जीवावर ओढावला. पाण्याचा अंदाज चुकल्याने संतोष, रोहित, मयूर, सुमित हे खोल पाण्यात बुडाले. इतर तिन्ही मित्रांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला परंतु ते अयशस्वी ठरले. घटनेची माहिती गावात पसरताच नागरिकांनी घटनास्थळी एकच गदी केली. दरम्यान, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथक तसेच आमगाव पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल होत बचाव व शोधकार्य सुरू केला आहे. वृत्त लिहीपर्यंत शोधकार्य सुरूहोते.

उशिरापर्यंत त्या मुलांचा काहीच पत्ता न लागल्याने अवघे गाव दु:खात लोटले. गावातील तरुण मुले वाहून गेल्याच्या घटनेमुळे मारबतचा उत्साह विरून गेला व कालीमाटीवासीयांना अन्न-पाणी कडू झाले.




आमगाव तालुक्यातील कालीमाटी हे गाव तीन हजार लोकसंख्या असलेले गाव आहे. विविध जाती-धर्माचे लोक या गावात गुण्या-गोविंदाने राहतात. सण, उत्सव, मेळावे, समाजातील चालीरीती व परंपरा एकोप्याने साजरी करतात. तान्हा पोळ्याचा दिवस मारबत म्हणून साजरा करताना गावातील शेकडो मुले मघेऊन जागे मारबतचाफ जल्लोष करीत घरातून गावातील शिवारावर गेली. परंतु, नदीत घडलेल्या घटनेमुळे दहशत घेऊन काही मुले घरी परतली, तर काही लोक नदीकाठावर राहून मदतीची याचना करीत होते.

गावातील तरुण चार मुले नदीत वाहून गेली व उशिरापर्यंत त्यांचा काहीच पत्ता न लागल्याने अवघ्या गावातच शोककळा पसरली होती. आता माहिती मिळणार हीच धाकधूक मनात ठेवून कालीमाटीवासी व वाहून गेलेल्या मुलांचे कुटुंबीय टक लावून बसले होते. सणाचा दिवस दु:खात बदलला व घराघरांत शिजलेले अन्न कुणाच्याही पोटात गेले नाही. दिवसभर जो-तो या घटनेवर दु:ख व्यक्त करीत होता. नदीत अंघोळ करायला गेलेली मुले सुखरूप घरी न परतल्याने घरातील सर्वजण आक्रोश करीत अश्रू ढाळत होते. पोळ्याच्या दिवशी घडलेल्या या घटनेमुळे कालीमाटी व परिसरातील गावेही दु:खात बुडाली होती व सर्वत्र शांतता पसरली होती. ऐकू येत होता तो फक्त त्या चार मुलांच्या घरातील सदस्यांच्या ढसाढसा रडण्याचा आवाज.

## बोनसचा दुसऱ्या टप्प्यात ३३६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध

**गोंदिया :** मागील खरीप हंगामात जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ७०० रुपये बोनस देण्याची घोषणा महाविकास आघाडी सरकारने केली होती. मात्र, ५० टक्के बोनसची रक्कम मिळण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. पण खा. प्रफुल्ल पटेल यांनी शेतकऱ्यांना ५० टक्के बोनसची रक्कम मिळेल, असा शब्द दिला होता. तो त्यांनी पाळला असून, राज्य सरकारने सोमवारी (दि. ६) बोनसचा दुसऱ्या टप्प्यात ३३६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.



शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी भाव मिळू नये, यासाठी जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून धान खरेदी केली जाते. मागील खरीप हंगामात शासकीय धान खरेदी केंद्रांवर धानाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ७०० रुपये बोनस ५० क्विंटलपर्यंत देण्याची घोषणा राज्यातील महाविकास आघाडी सरकारने केली होती. खा. प्रफुल्ल पटेल हे शेतकऱ्यांना बोनस मिळण्यासाठी सुरुवातीपासूनच आग्रही होते. त्यांनी गोंदिया - भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बोनस मिळणारच, अशी ग्वाही दिली होती. त्याची पूर्तता करीत खा. प्रफुल्ल पटेल यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ३३६ कोटी रुपयांचा निधी बोनससाठी उपलब्ध करुन दिला आहे. यामुळे आर्थिक संकटातील पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांना बोनसची रक्कम मिळावी, यासाठी माजी आ. राजेंद्र जैन, आ. मनोहर चंद्रिकापुरे, आ. राजू कारेमोरे हे खा. प्रफुल्ल पटेल यांच्या माध्यमातून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत होते. बोनसची रक्कम प्राप्त झाल्याने शेतकऱ्यांनी खा. प्रफुल्ल पटेल यांचे आभार मानले आहेत.

**...असे होणार बोनसच्या रकमेचे वितरण**

मागील खरीप हंगामातील बोनसची ५० टक्के रक्कम शासनाकडे प्रलंबित होती. ती आता उपलब्ध करुन दिली असून, गोंदिया ११२ कोटी ३६ लाख, भंडारा १२८ कोटी १९ लाख, चंद्रपूर २७ कोटी ८० लाख, गडचिरोली २७ कोटी ७२ लाख, नागपूर १८ कोटी रुपये आणि सिंधुदुर्ग आणि कोल्हापूरसाठी असा एकूण ३३६ कोटी ९८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

# महाज्योतीला १४८ कोटी मंजूर

**नागपूर:** ओबीसी, भटक्या व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाथी अर्थमंत्री अजित पवार यांनी महाज्योतीला १४८ कोटी रुपयांच्या वेतनेत्तर अनुदानाला मंजूरी दिली आहे. यातील १५ कोटी रुपये योजनांसाठी प्रत्यक्ष महाज्योतीच्या खात्यात जमाही केले असल्यानी माहिती संचालक प्रा. दिवावर गमे यांनी दिली आहे. मागील वर्षीप्रमाणे निधी परत जाऊ नये यासाठी अध्यक्ष विजय वडेट्टीवार आणि व्यवस्थापकीय संचालक प्रदीप डांगे यांनी सक्रिय होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) ओबीसी भटक्या व विशेष मागास प्रवर्गामधील विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धात्मक परीक्षा व किमान कौशल्य प्रशिक्षणासाठी स्थापन करण्यात आली. मागील वर्षी राज्य सरकारने महाज्योतीला १५५ कोटी रुपये मंजूर केले. ३५ कोटी रुपये प्रत्यक्ष खात्यात जमा केली. अर्थ खात्याच्या नियमानुसार प्रत्यक्ष दिलेला निधी खर्च करुन त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र दिल्यावर मंजूर निधीपैकी इतर रक्कम दिली जाते. मंजूर निधी त्याच वर्षात खर्च करण्याचे बंधन असते. या मुदतीत खर्च न झाल्यास हा निधी परत जातो. डांगे यांनी केवळ साडेतीन कोटी रुपये खर्च केले. सव्वाशे कोटी मिळण्याची खात्री असतानाही विद्यार्थ्यांसाठीच्या योजना राबविण्यात आल्या नाही. यंदाच्या योजना राबविण्यासाठी महाज्योतीचे संचालक प्रा. दिवाकर गमे, लक्ष्मण वडले यांनी अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ व अर्थमंत्री अजीत पवार यांची भेट घेऊन निधीची मागणी केली. पवार यांनी महाज्योतीला निधीची कमतरता भासू देणार नाही, असे आश्वासन दिले होते. त्याची पुर्तता या निमित्ताने केली आहे.

**अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक जवाबदार**

सारथी संस्थेने त्यांना मिळालेल्या निधीचा पुरेपूर उपयोग करुन मराठा समाजातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. तर दुसरीकडे ओबीसी विद्यार्थी नीट, सीईटी, एमपीएससी, युपीएससी व पीएचडी संशोधन प्रशिक्षण व आर्थिक मदतीसाठी महाज्योतीला साकडे घालत होते. व्यवस्थापकीय संचालक, अध्यक्षांना विनवनी करीत होते. यासाठी डांगे यांच्यासह अध्यक्ष विजय वडेट्टीवार हे देखील जवाबदार असल्याचा आरोप प्रा. दिवाकर गमे यांनी केला आहे.

महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

## मनरेगाच्या कामात अनियमितता;दोषींच्या निलंबनासाठी शिफारस करणार

**चंद्रपूर:** मागेल त्याला काम, असे ब्रीद असलेल्या रोहोयोच्या चंद्रपूर जिल्ह्यातील कामांत अनियमितता आढळून येत आहे. समितीकडून कोणत्याही जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची गय केली जाणार नसून, शासनाला निलंबनासाठी शिफारस करणार असल्याची माहिती रोहयो समितीचे प्रमुख आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी पत्रकारांना दिली.

रोजगार हमी योजना समितीने मागील तीन दिवसांपासून जिल्ह्यातील कामांची पाहणी केली. शनिवारी नियोजन भवनात अधिकाऱ्यांची बैठक घेतली. समितीने तीन गटात विभागणी करून १३ तालुक्यात पाहणी दौरा केले. जवळपास प्रत्येक विभागाचे अधिकाऱ्यांनी उत्कृष्ट म्हणून संबोधलेले काम बघितले. मात्र, कमी-अधिक प्रमाणात प्रत्येकच कामात अनियमितता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असल्याने या कामांची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करण्याचा निर्णय घेतला असल्याचे आमदार चंद्रिकापुरे यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाले असून, त्यांच्यासह इतर अधिकाऱ्यांचीही विधीमंडळ समितीसमोर साक्ष लावून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



मनरेगाचा विकास आराखडा, लेबर बजेट तयार करण्यात आले नसल्याने हजारो मजुरांना कामापासून वंचित राहावे लागले, असे समितीचे मत झाले आहे. समितीत १२ सदस्य सहभागी झाले होते. त्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात कामे पाहता आली नाही. सन २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या तीन वर्षांतील कामांचा पाहणी दौरा केला असून, काही दिवसातच यासंदर्भातील अहवाल तयार केला जाणार आहे.

**रोहयोच्या राज्य प्रमुखांसमोर परिस्थिती मांडणार**

ब्रह्मपुरी तालुक्यात मनरेगाच्या कामांमध्ये मस्टर नसताना निधी हस्तांतरणाचा प्रकार समोर आला असून, यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या पदाधिका?यांनीही तक्रार केली आहे. या कामांसंदर्भातील माहिती पुन्हा घेतली जाणार असून, रोहयोचे राज्य प्रमुख तथा अतिरिक्त मुख्य सचिवांना बोलावून त्यांच्यासमोर सर्व त्रुटी दाखविल्या जाणार आहे. त्यानंतर कारवाई केली जाणार असल्याचेही समितीप्रमुख आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी सांगितले.

## चार जुगार अड्ड्यांवर कारवाई; ३४ आरोपींना अटक

**गोंदिया:** पोळा पाडव्या निमित्त जिल्हा पोलिसांनी जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गस्त वाढविली होती. दरम्यान काल व आज तिरोडा, अर्जुनी मोरगाव व देवरी या तीन पोलिस ठाण्यांच्या हद्दित ४ जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई करण्यात आली. चारही घटनास्थळावरून तासपत्तीसह ४ लाख २२ हजार ४६० रुपयाचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. चारही कारवाईत एकूण ३४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तिरोडा : सणानिमित्त पोलिसांच्या गस्त कारवाई दरम्यान ५ व ६ सप्टेंबर रोजी दोन जुगार अड्ड्यांवर छापामार कारवाई करण्यात आली. घटनास्थळावरून १३ जणांना अटक करण्यात आली. तसेच ४ हजार ५३५ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. लोधीटोला येथील जुगार अड्ड्यावर केलेल्या कारवाईत उमेश ओंकार लिल्हारे, वडगु शोभेलाल अटराये, ई?वर बाबुलाल दुधमोरे, राजेश जोसीलाल तिवडे, शुभम टेकचंद लिल्हारे व पतिराम हिरापुरे सर्व रा. लोधीटोला यांना अटक करण्यात आली. तर दुसऱ्या घटनेत चिरेखनी येथील जुगार अड्ड्यावरून विजय खेमलाल रिनाईत, अमित दुलीचंद पारधी, लखन गोपीचंद पारधी, राजन दुलीचंद पारधी, युगल रमेश पारधी, अनिल शंकर नेवारे, गणेश प्रेमलाल रहांगडाले व छत्रपती राधेश्याम रहांगडाले सर्व रा. चिरेखनी यांना अटक करण्यात आली.

## जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा,भाजपाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**गोंदिया :** जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पावसामुळे खरीप पिकांना मोठे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांची पावसाअभावी रोवणी होऊ शकली नाही. तसेच पिकांना वेळोवेळी लागणारा पाऊस न पडल्याने शेतकऱ्यांचे पिक धोक्यात आले आहे. यामुळे जिल्ह्यातील शेतकरी चिंताग्रस्त झाले असून यावर्षी धानाच्या उत्पादनावर मोठा परिणाम पडून शेतकरी आर्थिक संकटात सापडणार असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने जिल्ह्याला दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी व भविष्यातील उपाययोजना करण्यात यावी. यासह शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांना घेऊन आज ६ सप्टेंबर रोजी भारतीय जनता पार्टीच्या गोंदिया तालुकातर्फे उपविभागीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.

यावेळी भाजपचे जिल्हा महामंत्री संजय कुलकर्णी, ग्रामिण मंडळ अध्यक्ष धनलाल ठाकरे, शहर अध्यक्ष सुनिल केलनका, दवनिवाडा मंडळ अध्यक्ष धनेंद्र अटरे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय टेंभरे, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष दिपक कदम, जिल्हा उपाध्यक्ष अशोक चौधरी, प्रकाश रहमतकर, नरेंद्र तुरकर, तालुका महामंत्री मनोज मेंढे, देवचंद नागपूरे, अर्जुन नागपूरे, सत्यम बहेकार, बंडू मानकर, जिल्हा सचिव राजेश चतुर, योगराज रहांगडाले, शहर महामंत्री मुकेश चन्ने, मनोज पटनायक, अंकित जैन, रमेश शहारे, कुलदिप रिनायत, विनोद बिसेन, अंकेश हरिणखेडे, नुरनाथ दिहारी, भुपेंद्र कटरे, जे.आर. पटले, शंभु ठाकुर, अरूण दुबे आदी उपस्थित होते.

## गोंदियात आज दोन बाधित, एक कोरोनामुक्त

**गोंदिया:** जिल्ह्यात ७ सप्टेंबर रोजी घेतलेल्या २९८ कोरोना चाचण्यांमध्ये दोन नवीन कोरोना बाधित आढळून आले. आता ९ क्रियाशील रुग्ण उपचार घेत आहे. आज एका रुग्णाने कोरोनावर मात केली. जिल्ह्यात आतापर्यंत ४१,२१० बाधित आढळले असून ४०,४९७ रुग्णांनी कोरोनावर मात केली. तर ५७६ रुग्णांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जिल्ह्यात आतापर्यंत ८ लाख ३८ हजार ६७७ जणांचे लसीकरण झाले आहे.

# पथदिवे सुरू होत नाही, तोपर्यंत उठणार नाही

## आ.पटोलेंच्या निवासस्थानी सरपंचांचा ठिय्या

**साकोली:** ग्रामपंचायत हद्दीतील पथदिवे व पाणी पुरवठा योजनेचे थकीत व चालू वीज देयकांचा भरणा जिल्हा प्रशासनाने महावितरणला करावा या मागणीकरिता साकोली, लाखनी तालुक्यातील सरपंच संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी ५ सप्टेंबर रोजी आ.नाना पटोले यांच्या घरी ठिय्या मांडला. जोपर्यंत गावातील खंडीत पथदिव्यांचा वीज पुरवठा सुरू होत नाही, तोपर्यंत ठिय्या उठणार नाही असा पावित्रा सरपंच संघटनेचे घेतला होता.

ग्रामपंचायतींनी पथदिवे व पाणी पुरवठा योजनेचा चालू वीज बिलांचा भरणा स्वःनिधीतून महावितरणला करावा असे परिपत्रक महाराष्ट्र शासनाचे उपसचिव तथा वित्त नियंत्रक यांच्या ६ ऑगस्ट रोजी काढून ग्राम पंचायतींचा ताण वाढविला आहे. अगोदरच कोरोना काळात आर्थिक संकटाचा सामना करीत आलेले शेतकरी व सामान्यांचे कंबरडे मोडले आहे. अशा परिस्थितीत ग्रामपंचायतीचे उत्पन्न घटल्याने तारेवरील कसरत करूनही वीजबिलांचा भरणा करण्यास असमर्थ ठरत आहे. वीज बिल न भरल्याने महावितरणने साकोली, लाखनी तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीमधील पथदिव्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्याचा सपाटा सुरूकेला आहे.

यामुळे ऐन पावसाळ्यात दोन्ही तालुक्यातील अनेक गावे अंधकारमय झाली आहेत. यामुळे गुन्हेगारीला थारा मिळेल अशी प्रकरणे वाढली असून रात्रीबेरात्री जंगली हिंस्त्र पशू गावात येण्याची भिती आहे. शासन यापुर्वी पथदिव्यांच्या वीजबिलासाठी शंभर टक्के अनुदान मंजूर करीत होते. आताही शासन स्तरावर अनुदान मंजूर करण्यात यावे व साकोली, लाखनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत हद्दीतील खंडीत पथदिव्यांचा विज पुरवठा सुरू करण्यात यावा या मागणीसाठी सरपंच संघटनेच्या वतीने ५ सप्टेंबर रोजी आ. नाना पटोले यांच्या घरी ठिय्या देण्यात आला. यावेळी आ. पटोलेंनी चर्चा करून संबंधित विभागाला दूरध्वनीद्वारे विद्युत पुरवठा सुरू करण्यास सांगितले. परंतु सरपंच संघटनेच्या पदाधिका-यांनी जोपर्यंत प्रत्यक्ष पथदिवे सुरू होत नाही, तोपर्यंत ठिय्या उठणार नाही असा पवित्रा घेतला. यावेळी मागणीचे निवेदन आ.पटोले यांच्यासह उर्जामंत्री, जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता महावितरण यांनाही पाठविण्यात आले.



या ठिय्या आंदोलनात साकोली तालुका सरपंच संघटना अध्यक्ष पवनकुमार शेंडे, नयना चांदेवार, शालिक खर्डेकर, प्रेमकुमार गहाणे, लाखनी सरपंच संघटना अध्यक्ष म.वा. बोळणे, प्रशांत मासुरकर, संगिता घोनमोडे, केशव बडोले, कल्पना सेलोकर, सुधाकर हटवार, हरिष लांडगे, पुरूषोत्तम रूखमोडे, प्रल्हाद शेंदरे, मोहन लंजे, चतुर्भुज भानारकर, रविंद्र खंडाळकर, देवेंद्र लांजेवार, भुमिता तिडके, उषा डोंगरवार, माधुरी कटरे, चंदा कांबळे, सुनिता हटवार, रविता मेंढे, आशा लाडे, लिलाधर सोनवाने, मुकेश कापगते, राजकूमार कापगते, खेमेश्वरी टेंभरे, वनमाला सिंदीमेश्राम, सरीता राऊत, अनुसया कोकोडे, रेखा कावळे, हरीशचंद्र दोनोडे, संजय बडवाईक, सुनिता समरीत, गायत्री टेंभुर्णे, पुष्पा खोटेले, भिमावती पटले, कमला भेंडारकर यांच्यासह साकोली, लाखनी तालुक्यातील शेकडो सरपंच येथे हजर होते.

# विदर्भातील ओबीसी संघटनांची महाज्योती संचालकांशी चर्चा

**गोंदिया::** ओबीसी विकासासाठी महाराष्ट्र शासनाने गठित महाज्योतीकडून राबविण्यात येत असलेल्या विकास योजनेसंदर्भात चिंतन बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीनंतर महाज्योती संस्थेचे नवनियुक्त पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक प्रदीपकुमार डांगे यांची ओबीसी संघटनांच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. ओबीसी विकास योजनेसंदर्भात त्यांना विचारणा करुन ओबीसी विकासासाठी नवनवीन कल्पना व योजनांची सुचना देखील त्यांना करण्यात आल्या.



चिंतन बैठकीत जिल्ह्यातील ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींनी जिल्हा पातळीवर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून दिरंगाई होत असलेला वसतिगृहाचा प्रश्न, ओबीसी विद्यार्थ्यांना स्वाधार योजना लागू न होणे, कुणबी समाजाचा मराठा समाजासाठी गठित सारथी व ओबीसी समाजासाठी गठित महाज्योती या दोन्ही संस्थेतून लाभ देऊन शासनाकडून कुणबी विरुद्ध अन्य ओबीसी असा वाद निर्माण करुन ओबीसी चळवळ खिळखिळी करण्याचा प्रयत्न, ओबीसी जनगणना आदि विषयावर मुद्दे उपस्थित करुन चर्चा घडवून आणली. तसेच ओबीसी विद्यार्थ्यांसाठी तालुका व जिल्हा स्तरावर निवासी वसतिगृह सुरू करण्याची कार्यवाही करावी जिल्हापातळीवर महाज्योती संपर्क केंद्र गठीत करने, बार्टीच्या धतीवर समतादूत प्रमाणे जिल्हा, तालुकापातळीवर "महाज्योती सेवक" या पदांची नियुक्ती करून ओबीसी विकास योजनांचा प्रचार-प्रसार करणे, महाज्योतीच्या योजनांची गावां-गावांत प्रसिद्धी करणे, त्यासाठी माहिती पत्रके वाटप करणे, पुस्तके प्रसिद्ध करणे, महाज्योतीची वेबसाईट अपडेट करणे, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक विकास योजना, शासकीय नोकरीत टक्का वाढविण्यासाठी विविध स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण योजनांसह ओबीसी युवक उद्योग - व्यवसायात पुढे येण्यासाठी कौशल्य विकासाच्या प्रशिक्षण योजना महाज्योती कडून राबविण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली.

चिंतन बैठकीत ओबीसी जनगणना समन्वयक बळीराज धोटे, राष्ट्रीय पिछडा वर्ग संघटनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष रमेश पिसे, स्टुडंट राईट्स असोसिएशनचे अध्यक्ष उमेश कोर्राम, जिल्हा ओबीसी संघटनेचे मार्गदर्शक खेमेंद्र कटरे, ओबीसी संघर्ष क्रांती समितीचे जिल्हा उपाध्यक्ष तीर्थराज उके, अशोक लंजे, ओबीसी सेवा संघाचे जिल्हा प्रतिनिधी प्रेमेंद्र चव्हाण, राम हेडाऊ, गोविंद दरवाडे, दळवी, शुभांगी मेश्राम, प्रमोद काळबांधे, अंजली साळवे, श्रावण फरकाडे, निकेश पिणे उपस्थित होते.

## संपादकीय

# मंदिर आंदोलन ओबीसी विरोधी

ओबीसी जनगणनेसाठी ओबीसींचा उठाव देशाच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात होत आहे. १९९० च्या ओबीसी उठावापेक्षा (मंडल लढा) आताचा उठाव व्यापक आहे, देशभर आहे आणि आरक्षण विरोधकांच्या चाली समजण्याइतपत मॅच्युरिटीपूर्ण आहे. १९९० ला ओबीसींमध्ये पुरेशा प्रमाणात जागृती नव्हती. तशी स्थिती आता नसली तरी बुद्धीची कवाडे बंद करुन आपल्या ओबीसी बांधवांना अपमानीत करणाऱ्या, प्रगतीपासुन मागे ठेवणाऱ्या सनातनी कृतीत डौल मिरवणारे तुरळक प्रमाणात भक्त आहेच. मालकांशी इमान दाखवणाऱ्या हालचाली ते करत आहेच. एकीकडे आरक्षण बंद झालं पाहिजे, असं घशाला कोरड पडेपर्यंत ओरडणारे देखील ओबीसी मधील जागृतीने घाबरलेले दिसत आहे. ओबीसी आरक्षणाचे समर्थन करायला लागले. ओबीसी बंधुनो हा बदल आपल्या कष्टकरी बांधवांसाठी, स्वतःच्या कच्च्याबच्च्यांच्या भविष्यासाठी मनापासून करावा ही विनंती. खोटं खोटं ओबीसी ओबीसी करणारांना भानावर यायला सांगा. जातीनिहाय जनगणना झाली नाही तर, ओबीसी आरक्षण टिकणे कठीण आहे. ९० च्या मंडल लढ्याला कमकुवत करण्यासाठी मंदिर मुद्याच्या आधारानेच ओबीसींमध्ये फुट पाडली. आताही तीच खेळी खेळण्याचे मनसुबे दिसत आहे. आरोग्य विभागाचे अभ्यासक मंदिरमार्गे कोविड साथीचा विळखा पडण्याची भीती व्यक्त करत असताना देखील मंदिर उघडण्यासाठी लोकांना भडकवण्याचे प्रकार सुरू आहे. यात ओबीसींना धार्मिक मुद्यांमध्ये गुंतवून ओबीसींच्या विकासाचे मार्ग मोकळे करणाऱ्या, ओबीसी आरक्षणाचा मार्ग अडथळामुक्त करण्यासाठी आवश्यक ओबीसी जनगणनेला खिळ घालण्याचे प्रयत्न आहे. लोकसंख्येच्या सर्वाधिक असलेल्या ओबीसी जाती समूहांचे देशाच्या प्रशासकीय व्यवस्थेत, अर्थव्यवस्थेत नगण्य स्थान आहे. ब्राम्हणांना सर्वोच्च स्थान देऊन इतर जातींच्या शोषणाची व्यवस्था असलेल्या जातीव्यवस्थेचा हा परिणाम आहे. धर्माच्या आवरणाखाली ब्राम्हणेतरांच्या शोषणाला बळकट करण्याचे काम वेळोवेळी झाले. धर्म व्यवस्थेच्या माध्यमातून उच्चनिचतेवर आधारलेल्या, असमान संधी देणाऱ्या जातिव्यवस्थेला मजबूत करण्याचे काम मंदिरांमधून केले जाते. महात्मा जोतीराव फुले यांनी म्हणूनच शेतकरी, कष्टकरी ओबीसी, दलित आदिवासींच्या शोषणाला, अधोगती साठी ब्राम्हणी धर्मग्रंथांना दोषी ठरवून कठोर चिकित्सा केली. संत गाडगेबाबा, देवळात देव नसुन पुजाऱ्याचे पोट असल्याचे सांगतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, रिकामा कशाला फिरतो, तुझे गावच नाही का तीर्थ, आणि कशाला काशी जातोरे बाबा,या व इतरही अनेक भजनांमधून लोकांना भान देण्याचा प्रयत्न करतात.प्रबोधनकार ठाकरे आपल्या 'देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे', या पुस्तकात पुरोहिताद्वारे ब्राम्हणेतरांच्या लुटीचा खरपूस समाचार घेतात. 'भिक्षुकशाहीचं बंड' या पुस्तकात देखील ते शोषणाचा, शोषकांचा धिक्कार करतात.

मंदिर व्यवस्थेतून ओबीसी हिंदूंना पंगु करण्याचं काम केलं जात आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी देवस्थानातील संपत्ती ओबीसी, दलित, आदिवासी यांच्या कष्टातूनच गोळा झालेली असल्याने, ती संपत्ती सरकारने ताब्यात घेऊन शिक्षण, आरोग्य आणि शेती विकासावर खर्च करण्याची मागणी लावून धरली. देवस्थान बील मांडले. शिक्षकांविषयी, शिक्षणाविषयी, शेतकऱ्यांच्या विषयी, सामाजिक न्यायासाठी, समतेसाठीच्या आरक्षण धोरणाविषयी तकलादू भूमिका घेणाऱ्यांविषयी राग व्यक्त केला तर आमच्या मित्रांना वाईट कां वाटते? हे समजत नाही. १९९५ च्या दरम्यान अन्ना हजारे यांच्या भ्रष्टाचार निर्मूलन समितीत काम करताना, आम्ही अन्नांना मंदिरातील भ्रष्टाचाराविरुद्ध भूमिका घेण्याविषयी प्रश्न विचारला होता. देवस्थान बिलाबाबत प्रश्न विचारला असता आपण मंदिरावर बोलणार नसल्याचे उत्तर दिले. या आंदोलनात सहभागी असलेले तुकारामदादा गिताचार्य मात्र त्याचवेळी सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्वच भ्रष्टाचाराच्या विरोधात लढण्याविषयी मत मांडत होते. डॉ. बाबा आढावांपासून सर्वच सामाजिक चळवळीतील फळी त्यावेळी भ्रष्टाचार निर्मूलन आंदोलनात उतरली होती. मंदिरांच्या संदर्भात त्यावेळी काहीही न बोलणारे अन्ना, मंदिर खुले करण्याच्या, ओबीसी विरोधी आंदोलनात सहभागी होत असेल तर राग व्यक्त का करायचा नाही?

**मेडिकल क्षेत्रातील ज्ञानाचा अपमान करणाऱ्या भूमिकेचा विरोध केलाच पाहिजे.**

मंदिरापेक्षा शिक्षणाची सर्वांना चिंता आहे. ते सुरू झाले पाहिजे असं सर्वांना मनोमन वाटते. शाळा सुरूकरण्याचा आग्रह धरला असता तर एकवेळ कळवळा समजू शकला असता. परंतु कोरोनासारख्या संपूर्ण जगाला वेठीस धरलेल्या साथीच्या आजारात आरोग्य क्षेत्रातील एक्स्पर्टचे ऐकायचे की भावनिक होऊन लोकांचे आरोग्य धोक्यात घालायचे?

तामिळनाडूचे मुख्यमंत्री मा. एम. के. स्टॅलिन, मंदिरात सर्व जातीचे पुजारी नेमण्याचा सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील समतेसाठी महत्वाचा निर्णय घेतात, तेव्हा त्यांचे अभिनंदन करुन देशभर हा निर्णय लागू करण्याचा आग्रह धरण्याची , किमान प्रेस नोट काढण्याची अपेक्षा महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी यांचं नाव घेऊन वाटचाल करणाऱ्या अन्नांकडून करायची नाही का? लॉकडाऊन मध्ये झालेले मजुरांचे हाल पाहुन सामान्य माणूस हळहळला, अन्नांना बोलायला वेळ नाही. शेतकऱ्यांचे रक्त सांडत असतांना, अन्नांना निमंत्रण पाहिजे. महागाई, गॅस, पेट्रोल, डिझेल दरवाढीबाबत काही बोलायला वेळ नाही. परंतु मागास कष्टकरी समुहाचं कोणतंही हित नसलेल्या मंदिर उघडण्याच्या प्रश्नावरून आंदोलनाची घोषणा अन्ना करत असेल तर ही संपूर्ण भ्रष्टाचार मुक्तीची भूमिका होऊ शकते का? समाज हिताचा विचार करणाऱ्या ब्राम्हणेतर तरुणांनी मंदिर उघडण्याचे आपल्या विरोधातील आंदोलन हाणून पाडले पाहिजे. केवळ देशभक्तीचे पोकळ नारे लावणाऱ्या, गरीबांना उपासमारीच्या खाईत लोटणाऱ्या लुटारुंच्या भक्तीत दंग झालेल्या ओबीसी, दलित, आदिवासी बांधवांनो आतातरी डोळे उघडा आणि आपल्या कष्टकरी मायबापांना न्याय देण्यासाठी आणि पुढील पिढीच्या भविष्यासाठी लोकसंख्या प्रमाणात शासन, प्रशासनात प्रतिनिधित्व तसेच इतरही सर्व क्षेत्रातील प्रतिनिधित्वासाठी संघर्ष करणे हाच महत्वाचा प्रश्न आहे. ५०टक्केपेक्षा अधिक असलेल्या उपेक्षित ओबीसी जातींना समान संधी, समान वाटा देणे हा खरा राष्ट्रहिताचा निर्णय आहे. राष्ट्राला पुढे नेण्याचा विचार आहे. लोकांचं हित न पाहता देशहित, देशभक्तीच्या गोष्टी करणे हा नकलीपणा आहे. वेळोवेळी न्यायालयांनी जातीनिहाय जनगणनेची गरज व्यक्त केली. त्यासाठी लढण्याची गरज आहे. आंबेडकरी विचारांचे समुह मंदिर चक्रात भरडल्या जाण्याचं प्रमाण कमी आहे. मंदिर चक्रात सर्वात जास्त नागवला जाणारा ओबीसीच आहे. म्हणून मंदिराचं राजकारण हे ओबीसी विरोधी आहे. धार्मिक आधाराने होणाऱ्या शोषणाला पायबंध घालण्यासाठी करजगावचे सत्यशोधक मोतीराम तु. वानखेडे यांनी १९०९ साली मस्वयंपुरोहितफ पुस्तक लिहिले. (संदर्भ : मविदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्यफ लेखक-डॉ. अशोक चोपडे) मंदिरातील पुजारी आणि विश्वस्त सर्व जातीतील घेतले पाहिजे, मंदिरातील संपत्तीचे ऑडीट करुन शेतकरी, कष्टकरी जनतेच्या उत्थानासाठी खर्च व्हावा हा आग्रह धरणे म्हणजे ख?्या अर्थाने देश हिताचा विचार आहे.यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले प्रबोधनकार ठाकरे समग्र वाडमय खंड १,४आणि५ फारच उद्बोधक आहे. यातील भिक्षुकशाहिचे बंडफ, देवळाचा धर्म आणि धर्माची देवळेफ, कोदंडाचा टणत्कार इत्यादी ग्रंथांमध्ये पुरोहितांचे मंदिरावर असलेले वर्चस्व आणि ब्राम्हणेतर हिंदूंची होणारी लुबाडणूक याचे विश्लेषण केलेले आहे.त्यामुळे हे ग्रंथ आजच्या संदर्भात मंदिर आंदोलन कसे ओबीसींच्या विरोधात काम करते हे समजून घेण्यासाठी आवश्यक आहे.

**बाबा बिडकर**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# समाज धार्मिकस्थळामुळे घडतो कि,ज्ञानाच्या मंदिरामुळे घडतो..।

सरकाराने सर्व समाजाची धार्मिकस्थळे बंद केली पाहिजेत आणि ज्ञानाची मंदिरे उघडली पाहिजेत दारुचे दुकाने सुरु असल्याने शासनाला आर्थिक बळ मिळत आहे आणि धार्मिकस्थळे सुरु केल्यास काय मिळणार...समाजाने कधी दारु बंदी करा म्हणून महाराष्ट्र बंद केला का.? समाजाला माहितं नाही का दारुमुळे कितीतरी संसार उध्वस्त झालेले आहेत पण समाजाला दारु चे काय करायचे त्यांना धार्मिकस्थळे महत्त्वाचे आहेत..आज काल सर्व धार्मिकस्थळे खुली करा यासाठी अनेक ठिकाणी आंदोलन केले जात आहेत मराठा बहूजन ओबीसी वर्गाने यात सहभागी होवू नये आपल्यासाठी भारतातील पहिली मुलींची शाळा व ईतर १७ शाळा ज्या फुले दांपत्यान सुरू केल्या आहेत या ज्ञान मंदिरासाठी समाजाने आंदोलन केले पाहिजे पुजाऱ्यांच्या पोटासाठी नव्हे, प्रत्येक समाजाच्या घरातील देव घर खुले आहे मग बाहेरील धार्मिक स्थळासाठी आंदोलन का?

किसी धार्मिकस्थळ मे जाके दान देणे से अच्छा किसी अनाथ आश्रम मे जाके दान दे ईश्वर मंदिर में नही अनाथ आश्रम में मिलेगा.

किसन(आण्णा) हजारे शेतकरी काही महिन्यांपासून रस्त्यावर आंदोलन करत असताना केंद्र सरकारच्या विरोधात चकार शब्द न काढणारा संघाचा पिठ्ठू सात आठ वर्षापासून स्वतः बेपत्ता राहून जनतेला मृत्यूच्या दाढेत ढकलण्यासाठी आज इशाऱ्याची भाषा करतोय.

आण्णा हजारे तुम्ही खरे समाज सेवक असता तर शाळा सुरु करण्यासाठी आंदोलन केले असते.

तुम्ही तर दलाल आहात म्हणून तर मंदिरासाठी आंदोलन करतात आण्णा हजारे तुम्हांला जनतेची खरच काळजी असती तर "धार्मिकस्थळे" ऐवजी "शाळा" सुरु करा म्हणून आंदोलन केले असते तसेच मंदिरे व सार्वजनिक सणावर बंदी आणावी असे केंद्राने परिपत्रक काढून राज्यसरकाला बजावले असूनही आंदोलन फक्त राज्यसरकार विरोधात का हा एक विरोधाभास आहे. महागाई, बेरोजगारी, पेट्रोल डिझेल एल-पीजी शेतकरी प्रश्न, शेतकरी आत्महत्या सरकारी संपत्तीची विक्री माहिती अधिकार कायद्याचे झाले ले खच्चीकरण इतक्या मोठ्या सामाजिक समस्येवर न बोलता धार्मिकस्थळे या विषयी आंदोलन करणे सामान्य जनतेला मान्य नाही.

अण्णा हजारे हे भाजपच्या हातातलं बाहुलं झाल्याचा आरोप पूर्वीच झाला आहे. अण्णांची विश्वासार्हता आता संपली आहे जनतेने आपल्या न्याय हक्क आणि समस्येसाठी स्वतः आवाज उठविला पाहिजे.जनतेने या राजकीय नेत्यांच्या कटकारस्थानाला बळी न पडता आपला आवाज बुलंद करायला हवा अण्णा हजारे म्हणजे मिडीयाने मोठे केलेले अत्यन्त खुजे आणि आत्म केंद्रित गृहस्थ.लोकपाल कायदा मोदी सरकारने गुंडाळून ठेवला. RTI कायदा कारण नसतांना Dilute केला. त्यावर आंदोलन करणे सोडून आता ते धार्मिक स्थळासाठी खुले करण्याचे आंदोलन करणार असल्याचे समजले. मंदिरांचे अर्थ कारण म्हणजे भट पुरोहित शाही मजबूत करणारे वर्चस्ववादी सत्ताशस्त्र होय अण्णांचा पोपट गेली सात ७ वर्षे प्रसिद्धी अभावी लुडकला होता. प्रसिद्धीचा रोग मोठा वाईट. प्रसिद्धीचा झोत नसेल तर अण्णांना जेवण कसे जाणार? आत अधी चड्डी नी वर धोतर घालणाराचे इतके अधःपतन झाल्याचे पाहून वाईट वाटते. 'राळेगण' या देशाचे दुर्दैव. त्यांचा बोलविता धनी कोण आहे हे समजणे कठीण नाही. इतिहास अण्णांची काय नोंद घेईल? देव ही एक श्रद्धा आहे आणि आपली श्रद्धा पूर्ण करण्यासाठी आपल्या प्रत्येकाच्या घरात देवालय निर्माण आपण केलेले आहे आणि आपण दररोज दर्शन घेतो, मग गावाच्या बाहेर किंवा शहरात असलेली मोठी मोठी धार्मिकस्थळे याचे निर्माण कार्य करण्याचा उद्देश काय?

कोरोनाच्या काळात जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने सरकारने मंदिरेच नाहीतर ज्ञानाची माहेरघर म्हणजे शाळा महाविद्यालय विद्यापीठ हे ही बंद केलेली आहेत. परंतु मनुवादी विचारसरणीचे लोक नेते लोकांच्या भावनिक श्रद्धेला हात घालून धार्मिकस्थळे खुलीकरण्यासाठी आंदोलन करीत आहेत. परंतु लोकांनी या भावनिक श्रद्धेला बळी पडू नये कारण मंदीर ही आपल्या प्रत्येकाच्या घरात सुद्धा आहे महाराष्ट्रीयन संतांनी भक्तिमार्गाचे खरे रूप नामस्मरणात सांगितलेले आहे. हेच नाही तर हे जनतेने लक्षात घेतले पाहिजे समाजाला ज्ञान देणाऱ्या ज्या संस्था आहेत त्या खूल्या करण्यासाठी पवित्रा न घेता, धार्मिकस्थळे खुले करण्यासाठी पुढे पुढे करणे आणि त्यात जनतेचा सहभाग म्हणजे देशाची प्रगती खुंटणे होय. आणि समाजाच्या सुधारणेसाठी प्रयत्नाची पराकाष्ठ करून समाजामध्ये समताफ स्वतंत्रता बंधुता या मूल्यांची रुजवणूक करणाऱ्या अशा सर्व महापुरुषांच्या आणि संतांच्या विचारांची पायमल्ली होत आहे असे समजावे.ज्ञानाच्या शाळा ऑनलाईन चालू आहेत तसेच मंदिर पण ऑनलाईन चालू करा आणि दर्शन घ्या उगाच आंदोलन करू नका रे..कोरोना काळात बेड व ऑक्सिजन साठी बोंबा मारणारे,आता मंदिर उघडा म्हणून बोंबा मारत आहेत..

विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करीं स्वतंत्र निर्भय ।

शिक्षणाने वाढावा निश्चय ।जीवन-जय करावया.. – ग्रामगीता

अण्णांच्या शाळा बंद राहू द्या पण मंदिरे उघडा या वक्तव्याशी आमची असमती आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेत त्रुटी नक्कीच आहेत. पण त्यावर शाळा बंद ठेऊन मंदिरे उघडणे हा उपाय नक्कीच नाही. रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी चिंता व्यक्त करत एक, दोन वर्षे शाळा बंद असतील तर आपण देशाच्या एक पिढीचे नुकसान करत आहोत असे म्हटले होते शिक्षणाचे महत्व एक उच्चशिक्षित व्यक्तीच समजू शकतो ७ वी पास नाही. भाजपने मंदिरातील पुजाऱ्यांना भटाला स्वखर्चातून पगार सुरु करावी. महामारीच्या भयानक काळात धार्मिक स्थळं सुरु करण्याचा हट्ट धरू नये. शेटजी भटजीचा पुळका बरा नाही...

धार्मिकस्थळे बंद ठेवून जर गरिबांचे हाल होत असतील किंवा त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे धंदे बंद होत असतील तर मंदिर प्रशासनाने मंदिरात जमलेल्या पैसा अशा लोकांसाठी खर्च करावा ते पुण्याचे कार्य होईल.समाजाने विचार केला पाहिजे कि आपला समाज धार्मिक स्थळामुळे घडतो कि ज्ञानाच्या शाळे मुळे हा विचार केल्यावर नवीन वैचारिक विचारांची क्रांती निर्माण होईल..।

जगण्यासाठी भाकरी न देणारा देव मेल्यानंतर स्वर्ग तरी कोठून देणार.?

**लेखक – शिवश्री संतोष शकूंतला आत्माराम बादाडे**
**जिल्हाध्यक्ष पुणे – ९६८९४४६००३**
**जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद,महाराष्ट्र राज्य..**

## आमदार रहांगडालेंच्या हस्ते ३०.०० लक्ष मंजूर विविध विकास कामाचे भूमिपूजन



**तिरोडाः**–तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या माध्यमातून विधानसभा क्षेत्रातील गोंदिया गोंदिया तालुक्यातील विविध विकासकामांचे भूमिपूजन संपन्न झाले यामध्ये एकोडी येथे एकोडी येथिल प्राथमिक शाळेला आवरभिंत बांधकाम व सौदयीकरण, जि.प. हायस्कूल येथे पेव्हर ब्लाक लावणे, प्राथमिक शाळा रामपुरी येथे पटांगनावर पेव्हर ब्लाक लावणे असे एकूण ३०.०० लक्ष, बांधकामाचा समावेश असून भूमिपूजन तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले, माजी जि. प. उपाध्यक्ष मदन पटले, माजी उपसभापती डॉ.वसंत भगत, एकोडी सरपंच शालूताई चौधरी, उपसरपंच वर्षाताई अंबुले, भाजप जिल्हा सचिव अजाब रीनाईत, महेंद्र बघेले, माजी जि. प. जि. प. सदस्य रेखाताई चौधरी, माजी प. स. सदस्य पवन पटले, खेमेन्द्र तिडके,माजी उपसरपंच किरण मेश्राम,ग्रा.प. सदस्य पुरुषोत्तम भदाडे, राकेश बिसेन, जगजीवन वधारे, दीपक रिणाईत, शुभम बोदेले, शबनम पठाण, संगीता रिणाईत, वहिदा शेख, रंजु पटले, संगीता वरठी, बेनुताई बिसेन, खालीकभाई पठाण, हमजाभाई शेख,पंकज मेश्राम व गावकरी उपस्थित होते.

## पोंगेझरा प्रवेशद्वाराकडे वनविभागाची पाठ



**गोरेगाव:** गोरेगाव वनविभांतर्गत येणाऱ्या आसलपाणी बीटमधील पोंगेझरा प्रवेशद्वारावर वर्षभरापासून पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. तसेच येथील सौर उर्जा कृत्रीत पाणी पंप नादुरुस्त असून धूळखात पडून आहे. याकडे वनविभागाने पाठ फिरविली असून या परिसरात दूरपर्यंत पिण्याच्या पाण्याची सोय नाही. त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांसह वन्यप्राण्यांनाही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. गोरेगाव वनविभांतर्गत येणाऱ्या आसलपाणी बीट नागझिरा अभयारण्य वनपरिक्षेत्रापासून लागून आहे. अशात वन्यप्राण्यांची वाढती संख्या पाहून येथे २०१६ मध्ये वनविभागातर्फे सौर उर्जा कृत्रीम पाणी पंप लावण्यात आले होते. परंतु देखरेखअभावी एका वर्षातच या मोटारपंपचे तीनतेरा वाजले. तेव्हापासून या मोटारपंपाची दुरुस्ती करण्यात आली नाही. दरम्यान, पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेलचे खोदकाम करण्यात आले. परंतु या बोअरवेलमध्येही मागील वर्षी बिघाड आल्याने तीही नादुरुस्त आहे. त्यामुळे पोंगेझरा येथील वन कर्मचाऱ्यांना व वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

विशेष म्हणजे पोंगेझरा प्रवेदशद्वारापासून दूरपर्यंत पाण्याची सोय नसल्याने वन विभागातील कर्मचाऱ्यांना दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या बोळूंदा येथे जाऊन पाण्याची सोय करावी लागत आहे. परंतु वन्यप्राण्यांना आजही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. परिणामी त्यांना गावाकडे आपला मोर्चा वळवावा लागत आहे. जीवनासाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्याकडे वनविभागाने पाठ फिरविली आहे.

## श्रीमती सरस्वतीबाई महिला विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनी शिष्यवृत्तीस पात्र

**गोरेगाव:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेतर्फे घेण्यात आलेल्या एनएमएसमएस परीक्षेत श्रीमती सरस्वतीबाई महिला विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनी शिष्यवृत्तीस पात्र ठरल्या आहेत. परीक्षेत एकुण २६ विद्यार्थिनी बसल्या. त्यापैकी ४ विद्यार्थिनी उत्तीर्ण तर २ विद्यार्थिनी शिष्यवृत्तीस पात्र ठरल्या आहेत. सुशय प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विना दसाराम पटले व दिव्यांशी भागवत मडावी यांचा समावेश आहे. या परीक्षेसाठी शाळेतच्या विज्ञान शिक्षीका अनिता संतोष तुरकर यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष दीपमभाई पटेल, मुख्याध्यापक मुकुंद दिक्षीत तसेच सर्व शिक्षकवृंदानी कौतुक केले आहे.



## शिक्षणविरोधी धोरणामुळेच ठाकरे सरकारने शिक्षकांचे पुरस्कार रोखले!

**गोंदिया :** शाळाप्रवेशापासून निकालापर्यंतच्या प्रक्रियेतून शिक्षणाचा खेळखंडोबा करणा?्या ठाकरे सरकारने राष्ट्रीय शिक्षक दिनी शिक्षकांना पुरस्कार देण्याची प्रथा बंद करून शिक्षकांचीही उपेक्षा केली आहे. सलग दोन वर्षे राज्य शिक्षक पुरस्कार बंद करून शिक्षणाचे काटे उलटे फिरविण्याचा हट्ट मागे घेऊन शिक्षक पुरस्कारांची प्रथा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

राज्य शासनातर्फे राज्यातील शिक्षकांना ५ सप्टेंबरला आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्याची प्रथा ठाकरे सरकार सत्तेवर आल्यानंतर कोणतेही कारण न देता बंद करण्यात आली. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांसाठी राज्यातील शिक्षकांकडून आवेदनपत्रे मागवून राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांचे वितरण सोहळे पार पाडणाऱ्या ठाकरे सरकारला राज्याचे पुरस्कार बंद करताना खंत वाटली नाही, असा आरोपही मानकर यांनी केला. राष्ट्रीय पातळीवर राज्यातील शिक्षकांचा सन्मान होत असताना, शालेय शिक्षणात महत्वाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कारापासून वंचित ठेवून राज्य सरकारने आपले शिक्षणविरोधी धोरण उघड केले आहे, असे ते म्हणाले.

(उर्वरित पान ३ वर)

## कट्टरवाद कुठलाही असो तो कायम जाळणारच...

कट्टरवाद मग तो कोणताही असो तो वाईटच. तो माणसांना माणसांपासून दूरच करणार. आजकाल समाजात प्रत्येकच क्षेत्रात कट्टरवाद आपल्याला वाढताना दिसतोय. सद्यस्थितीत फक्त एक माणूस म्हणून विचार करणार, एक भारतीय म्हणून व्यक्त होणारं तटस्थ (न्यूट्रल) व्यक्तिमत्व प्रचंड दुर्मिळ झालेलं आहे. व्यक्ती मग तो पुरोगामी असो की प्रतिगामी, स्वतः ला धर्मनिरपेक्ष म्हणवणारे असोत की धार्मिक, नास्तिक असोत की आस्तिक प्रत्येक च व्यक्ती आज कुठल्यातरी विचारधारेला घेऊन कट्टर आहे. हाच कट्टरवाद माणसाला माणूस बनविण्यापासून रोखतो.

आजकाल हिंदू-मुस्लिम कट्टरवाद्यांप्रमाणेच पुरोगाम्यांमध्ये सुद्धा कट्टरवाद घुसला आहे. मी नेहमीच डावे, पुरोगामी आणि आंबेडकरवादी म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारी चिकित्सक जमात असे समजत आलोय परंतु सद्यस्थितीत अनेक ह्या सर्व चळवळी सुद्धा या कट्टरवादाला बळी पडत आहेत. तुमची विचारधारा कोणतीही असो त्यातली लवचिकता संपून कट्टरवादाची ताठरता आली की त्याचे महत्व संपुष्टात येते. मग तो माणूस राहात नाही तो होतो रोबोट.

ज्याला स्वतः च्या धर्माचा किंवा विचारधारेबद्दल अभिमान असतो परंतु तो अभिमान बाळगतांना जो इतरांच्या धर्माचा- विचारधारेचाही सन्मान करतो, म्हंणजेच इतरांना आपल्या धर्म व विचारधारेबद्दल आदर वाटेल असे वर्तन-वक्तव्य करतो तो खरा माणूस. आणि महत्वाचं म्हणजे पुरावे भेटल्यानंतर आपल्या विचारांमध्ये बदल करण्याइतपत लवचिकता ठेवतो तो खरा वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारा पुढारलेल्या विचारांचा पुरोगामी.

आपल्या महापुरुषाच्या किंवा नेत्याच्या विचारांचे आपणच एकमेव प्रामाणिक पाईक आहोत आणि बाकी सगळे अप्रामाणिक किंवा अविश्वासू आहेत ही वृत्ती हिंदू-मुस्लिम, उजव्या-डाव्या विचारसरणीच्या, आंबेडकरी व इतरही सर्व सामाजिक चळवळींना मारक ठरते आहे.

बाबासाहेब म्हणतात, "आपण जर एकाच विषयावर दोनदा किंवा अधिकवेळा बोललो अथवा लिहिले असेल आणि त्यात विसंगती असेल तर त्यातील कालानुक्रमे शेवटी आलेले मत प्रमाण मानावे" म्हणजे आज माझे जे विचार असतील ते उद्या बदलू सुद्धा शकतात. माझे जे शेवटचे विचार असतील ते माझे मत समजावे. पुढे ते म्हणतात "जबाबदार माणसाकडे पुनर्विचार करण्याचे आणि आपले विचार बदलण्याचे धाडस असलेच पाहिजे." म्हणजे ज्याला आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव आहे अशा प्रत्येकाने आपल्या प्रत्येक मतावर पुनर्विचार करण्याचे आणि तो पुनर्विचार करतांना जर आपल्या मताच्या विरोधात काही सबळ पुरावे, ठोस संदर्भ मिळाले तर आपलं मत बदलण्याचं धाडस असलंच पाहिजे. याठिकाणी बाबासाहेबांनी मधाडसफ हा शब्द याकरिता वापरला आहे की सत्य स्वीकारायला खूप हिम्मत लागते. आज मी जे बोलतो, सांगतो, लिहितो तेच सत्य असं मानणे म्हणजेच कट्टरवाद.

बाबासाहेबांवर काही लोकांनी आरोप केले की, तुमच्या आधीच्या आणि आताच्या विचारांमध्ये तफावत आहे, भिन्नता आहे. अशांना बाबासाहेबांनी फार मार्मिक उत्तर दिलेलं आहे जे सर्वच चळवळीतील कार्यकर्त्यांनी कायम लक्षात ठेवलं पाहिजे म्हणजे चळवळी आणि कार्यकर्ते दोघेही कट्टरवादी व दिशाहीन होणार नाहीत. बाबासाहेब म्हणतात, " द्वेषबुद्धीने माझ्यावर टिका करणाऱ्या आणि माझ्या विसंगतीचेच भांडवल करूपाहणाऱ्या माझ्या टिकाकाराला मी सरळ उत्तर देत आहे. विचारातील सातत्य, सुसंगती, तोचतोचपणा हा गाढवाचा सद्गुण आहे असे इमर्सनने म्हटले आहे. सुसंगती राखून मला गाढव व्हायचे नाही. सुसंगतीच्या नावाखाली एकेकाळी व्यक्त केलेल्या मताला कोणताही विचार करणारा माणूस स्वतःला जखडून घेणार नाही. सुसंगतीपेक्षाही जबाबदारी जास्त महत्वाची असते. जबाबदार माणसाकडे एकदा शिकलेले विसरून जाण्याचे, पुनर्विचार करण्याचे आणि आपले विचार बदलण्याचे धैर्य असले पाहिजे. अर्थात तसे करण्यासाठी त्याच्याजवळ पुरेशी आणि सबळ कारणे असली पाहिजेत. कारण विचारविश्वात अंतिम असे, शेवटचा शब्द म्हणून काही नसते." म्हणजेच आपल्या मतावर पुनर्विचार क्षमता नसणाऱ्या, ठोस पुरावे-कारणं मिळूनसुद्धा मेरी मुर्गीकी एक ही टांग म्हणणाऱ्या, मझंच खरं असं मानणऱ्या , आपल्या मतावर अडून बसणाऱ्या लोकांना बाबासाहेबांनी गाढवाची उपमा दिली आहे. आपली विचारप्रक्रिया जोपर्यंत शाबूत आहे तोपर्यंत आपले विचार कधीही बदलू शकतात त्यात गैर काही नाही. हे आपण समजून घेतलं पाहिजे.

महात्मा गांधींनी सुद्धा माझ्या आयुष्यातील एखाद्या विषयावरील माझ्या मतांमध्ये भिन्नता आढळत असेल तर माझा त्या विषयावरील अंतिम मत प्रमाण मानावे असे सांगून ठेवले आहे. पण आज तालिबान किंवा देशांतर्गत कट्टरवादी संघटनांना आपण कट्टरवादी संबोधतांना आपणसुद्धा आपल्या मताबद्दल अगदीच कट्टर होत आहोत हे आपल्या लक्षात येत नाही.

माझ्या पक्षाच्या नेत्याने किंवा माझ्या धर्माच्या महापुरुषाने सांगितलेली गोष्ट खोटी असूच शकत नाही, त्यांच्यापेक्षा ज्ञानी जगात कुणीच नाही असे म्हणून एखाद्या नेत्याने-महापुरुषाने सांगितलेल्या गोष्टींवर ठाम राहणे, त्या गोष्टींची चिकित्सा न करणे, तेच अंतिम सत्य मानणे हासुद्धा कट्टरवादच. दहशतवादी संघटनासुद्धा यापेक्षा दुसरा कुठला विचार करतात? ही व्यक्तिपूजाच कट्टरतेला जन्म देते. हजार वर्षांपूर्वी कुणी म्हंटल असत की पृथ्वी शेषनागाच्या फणावर उभी आहे तर त्यावेळी त्याविषयी माहिती नसल्याने तेच अंतिम सत्य मानलं गेलं. त्याच माहितीला सत्य मानून जर शास्त्रज्ञ शांत बसले असते, विचारप्रक्रियेचा वापर केला नसता तर आजही आपण त्याच असत्याला सत्य मानून चालत असतो. आणि विज्ञानाने इथपर्यंत प्रगती केली नसती. आज जर आपण असे विधान करू तर आपण मुर्खात निघू. आज सत्य समोर आल्यामुळे जुनी असत्य माहिती आपोआपच खोडली गेली आहे. अशी जुन्या धर्मग्रंथातील माहिती किंवा एखाद्या महापुरुषाने सांगितलेली माहिती आजच्या ज्ञानानुसार कालबाह्य झाली किंवा असत्य ठरली तर त्यात जुन्या धर्मग्रंथांचा किंवा महापुरुषांचा अपमान होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. त्या लोकांना त्यावेळी जी अंतिम माहिती होती त्या माहितीच्या आधारावर त्यांनी त्यावेळी ग्रंथांमध्ये ती नोंद केली. त्यात त्यांची चूक नाही. पण आज विज्ञानाद्वारे सत्य लख्ख प्रकाशाप्रमाणे समोर येऊनसुद्धा जर सत्याला नाकारू तर आपण निश्चितच मुर्खात गणले जाऊ.

कोणत्याही विचारसरणीच्या माणसाने हा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे की कोणताही धर्म किंवा कोणतीही विचारसरणी कशासाठी बनविल्या गेली? उजवी-डावी, पुरोगामी-प्रतिगामी, कम्युनिस्ट, मार्क्सवादी ह्या सर्व विचारसरणीद्वारे मानवाचं कल्याण करायचं आहे की मानवाचा नाश करायचा आहे? मनुष्य जातीतील भेदभाव नष्ट करून त्यांना जवळ आणायचं आहे की आपसातील वाद-द्वेष वाढवून त्यांच्यात भांडणे लावून त्यांना संपवून टाकायचं आहे? निश्चितच सर्वच विचारसरणीच्या प्रतिनिधींचे उत्तर असेल मानवाच्या भल्यासाठी, त्याच जीवन सहज आणि सुकर व्हावं, मनुष्य जातीचं कल्याण व्हावं यासाठीच आमची विचारसरणी आहे. मग आपल्या विचारसरणीचे फलित म्हणून तो मनुष्य जातीचा विकास होतोय का? त्याला अधिकाधिक स्वातंर्त्य मिळतंय का? की त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होतेय? हा सर्व विचार प्रत्येकच विचारसरणीच्या व्यक्तींनी केला पाहिजे.

आपल्या विचारसरणीने समोरच्या व्यक्तीत सकारात्मक परिवर्तन झालं पाहिजे. कट्टरवादाने व्यक्ती कायमचा तुटतो. आज आपण अनेक व्यक्तींशी विनाकारण शत्रुत्व घेवून बसलोय. एखादी व्यक्ती अमुक पक्षाची आहे, अमुक विचारसरणीची आहे म्हणून तीला आपली शत्रु मानतो. तीच्याशी संवाद साधण्याचा कधीच प्रयत्न करत नाही. यामुळे माणसा-माणसातील अंतर वाढत चाललंय. होवू शकते की तुम्ही सौम्यपणे, संदर्भ देवून तुमचे मत मांडले तर ती व्यक्ती बदलेल किंवा त्या व्यक्तीने काही ठोस पुरावे देवून तीची बाजू मांडली तर तुमचं मत बदलेल. पण हे तेव्हाच घडेल जेव्हा तुम्ही विचारसरणीत लवचिकता ठेवाल. कट्टरवाद नव्हे.

आज लोकशाहीच्या शत्रूंना सगळीकडून कट्टरवादच अपेक्षित आहे. कारण जिथे कट्टरवाद तिथे हुकूमशाहीला अत्यंत पोषक वातावरण मिळत. डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीसंबंधी जे सांगितले ते फार मोलाचे आहे. ते म्हणतात, 'आम्ही जे काही करू त्यातून लोकशाहीच्या शत्रूंना स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांचे उच्चाटन करण्याच्या कामी आमची मदत होता कामा नये.' म्हणजेच देशाचे नागरिक जितके कट्टरवादी असतील तितका लोकशाहीच्या शत्रूंना लोकशाही मिटविण्यास हातभार लागणार. कारण कट्टरवाद धार्मिक असो की वैचारिक तो मानव जातीला जोडणार नाही तर कायम जाळणारच.

**–चंद्रकांत झटाले, अकोला**
**९८२२९९२६६६**

# तिरोडा कृउबासच्या लेखा परिक्षणात भ्रष्टाचारा ठपका

## ■८ सप्टेंबर रोजी स्पष्टीकरणासाठी सुनावणी■संचालक मंडळ आरोपाच्या कठघऱ्यात

**गोंदिया :** तिरोडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सन २०१८ ते २०२० या वर्षाचे लेखा परिक्षण अहवालात अनेक आर्थिक त्रुट्या आढळल्या आहेत. त्यामुळे सहकारी संस्थेच्या जिल्हा निबंधकांनी भ्रष्टाचारा ठपका ठेवत संचालक मंडळाला आरोपीच्या कठघऱ्यात उभे केले आहे. लेखा परिक्षणावर आढळलेल्या घोळ व त्रुट्यांचे स्पष्टीकरणाकरिता १५ दिवसाची मुदत तसेच ८ सप्टेंबर रोजी थेट सुनावणी ठेवली आहे. यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचा भ्रष्ट कारभाराची चांगलीच चर्चा रंगू लागली आहे. या प्रकरणात किती सत्यता आहे, हे आता जिल्हा निबंधकाच्या सुनावणीनंतरच्या निर्णयावरून स्पष्ट होणार आहे.



सविस्तर असे की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाचे लेखा परिक्षण पूर्ण झाले. दरम्यान अंकेक्षण अहवालामध्ये काही दोष दिसून आले. त्यामध्ये सन २०१७-१८ चा दोष दुरुस्ती अहवाल समितीने सादर केलेला नाही. या शिवाय लेखा परिक्षण कालावधीमध्ये किरकोळ बांधकामासाठी १२ लाख ६९ हजार २४५ रुपयाचा खर्च विना निविदा करणे, ३१ मार्च २०१९ च्या टाळेबंधानुसार अग्रीम म्हणून १ कोटी ८७ लाख ४६ हजार ८५४ रुपये यासह इतर खर्चाम ध्ये तफावत दिसून आली आहे. तसेच समितीने २४ लाख ४६ हजार ३७७ रुपयाचा दर पत्रक किंवा निविदा न करता डेडस्टॉक खरेदी केलेला आहे. यासह अनेक मुद्दावर समितीने नियम बाह्य काम केल्याचे अत्यंक्षण अहवालात दिसून आले.

### राजकीय वर्तुळात खळबळ

**तिरोडा येथील बाजार समितीवर भारतीय जनता पक्ष प्रणित संचालक मंडळ गठीत आहे. समितीचे अध्यक्ष चिंतामन रहांगडाले आहेत. यासह एकूण १९ संचालक आहेत. या पूर्वीही बाजार समितीच्या कारभाराला घेवून तासेरे ओढण्यात आले. मात्र आता अंकेक्षण अहवालात आढळले दोष हे समितीला तारणार की मारणार अशी चर्चा सुरू झाली असली तरी याचा फटका पुढे होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीवर पडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.**

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम १९६३ आणि १९६७ तसेच बाजार समितीचे मंजुर पोटनियमन नुसार समितीवर सोपविलेली जबाबदारी पार पाडली नसून संचालक मंडळ नेमून दिलेले कर्तव्य पार पाडण्यात कसूर केलेला असून याला समितीचे सदस्य जबाबदार असल्याचे स्पष्ट झाल्याने जिल्हा उपनिबंधकांनी याची दखल घेत सर्वांना नोटिस बजावली आहे. त्या अनुषंगाने संचालक मंडळाने आपले स्पष्टीकरण व खुलासा १५ दिवसाच्या आत सादर करावा तसेच ८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता सुनावणीसाठी उपस्थित रहावे, असे निर्देश दिले आहेत.

(पान २ वरून )

गेल्या वर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार दिले गेले नाहीत, या वर्षी त्यासंबंधीचे कोणतेही परिपत्रकदेखील जारी केले नाही. शिक्षकांनी वारंवार मागणी करूनही सरकारतर्फे निवड समिती किंवा निवड प्रक्रियाही जाहीर करण्यात आली नाही. गेल्या वर्षी पुरस्कारांची निवड न केल्याने जे आदर्श शिक्षक पुरस्कार व त्यापासूनच्या लाभापासून वंचित राहिले, त्यांची निवड करावी व यंदाचे पुरस्कार तातडीने जाहीर करून शिक्षण क्षेत्राचा अपमान थांबवावा, अशी मागणीही या पत्रकात करण्यात आली आहे.

शिक्षकांच्या विविध समस्यांबाबत राज्यभरातील शिक्षकांची असंख्य गाऱ्हाणी सरकारदरबारी प्रलंबित आहेत. शिक्षकांच्या वेतनवाढीचा मुद्दा प्रशिक्षणाची निरर्थक अट घालून सरकारने सतत टांगणीवर ठेवला आहे. फडणवीस सरकारने प्रशिक्षणाची अट रद्द करून तसा शासन निर्णय जारी केल्यानंतरही ठाकरे सरकार मात्र या अटीशी अडून बसले असून शिक्षकांना लाभापासून वंचित ठेवून सरकार गंमत पाहात आहे, असा आरोप मानकर यांनी केला. विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांची तर परवड सुरू असून अनेक महिने हजारो शिक्षक वेतनापासूनही वंचित आहेत.

# नंगपुरा मुर्री अतिक्रमणाच्या विळख्यात, प्रशासनाचे दुर्लक्ष

**गोंदिया :** शहराला लागून असलेल्या नंगपुरा मुरी ही मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्राम पंचायती अंतर्गत एफसीआयचे गोदाम तसेच शासकीय वसतीगृह या सारख्या संस्था आहेत. या शिवाय शहरातील अनेक व्यापाऱ्यांचे गोदामही आहेत. मात्र मागील काही वर्षापासून ग्राम पंचायतीच्या आर्शिवादाने गावात अतिक्रमणाला जोर आला आहे. अनेक नागरिकांनी अवैधरित्या शासकीय जागेवर अतिक्रमण केले आहे. या बाबतची तक्रार ग्रामपंचायत तसेच संबंधित यंत्रणेला करण्यात आली. परंतु अद्यापही याची दखल घेण्यात आली नसल्याने प्रशासनाचे आर्शिवाद अतिक्रमण धारकांना असल्याचे बोलले जात आहे.

शहराला लागून असल्याने नंगपुरा मुर्री या ग्राम पंचायतीला वेगळे महत्व प्राप्त आहे. गावातील जमिनीचे दर गगणाला भिडले आहेत. याच संधीचा लाभ घेत गावात अतिक्रमणाचा जोर वाढला आहे. शासकीय जागेवर अतिक्रमण करणारे मधुकर रहांगडाले, भैय्यालाल रहांगडाले, सौ. विना टालटे, सौ. पुजा बिजेवार, लक्ष्मीकांत रहमतकर, तिर्थराज रहांगडाले, अभिमन्यु सोनेवाने, भुमराज रहमतकर, संदीप टेंभेकर यासह अनेकांची तक्रार गावातील नागरिक तिर्थराज हरिणखेडे यांनी निवेदनाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीसह जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, खंडविकास अधिकारी यांना दिली. मात्र तक्रारीनंतर प्रशासकीय यंत्रणा कोणतेही कारवाई करण्यास पुढे आलेली नाही. जर या प्रकारावर आळा बसला नाही तर गावात असलेली खुली शासकीय जागा शिल्लक राहणार नाही, अशी भिती ग्राम स्थांनांनी व्यक्त केली आहे. या प्रकाराला ग्रामपंचायत जबाबदार असून गावातील अतिक्रमण त्वरित काढण्यात यावे, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.



### रेती व बजरीची अवैध साठवणूक

**अतिक्रमण केल्यानंतर अनेकांनी उर्वरित शासकीय जागेवर अनेक मिकाणी रेतीचा व बजरीचा अवैध साफा मेवण्यात आला आहे. रेती तस्करांनी पावसाळ्यापूर्वीच हा साफा करून मेवला आहे. एकीकडे महसूल विभाग ग्रामीण भागातील ट्रॅक्टर चालकांना अवैधरित्या रेती वाहतूक प्रकरणी कारवाई करते. तर दुसरीकडे अवैधरित्या मेवलेला शासकीय जागेवरील रेती व बजरीचा अवैध साफा यावर कारवाई का करीत नाही? असा सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.**

# मनोली येथे सुसज्ज ग्रंथालयाची स्थापना करा-युवकांची मागणी




**नवेगावबांध:** (अर्जुनी-मोर)-नवेगावबांध हे राष्ट्रीय उद्यान, न्यू नवेगाव नागझिरा अभयारण्य यासाठी जगप्रसिद्ध आहे. येथील वनात अनेक दुर्मिळ प्राणी, पक्षी, वनस्पती आढळून येतात. यासाठी येथील जंगले पशुपक्षी, वनस्पती अभ्यासकांसाठी कायमची आकर्षणाची राहिले आहेत. जागतिक ख्यातीप्राप्त पक्षी तज्ञ डॉक्टर सलीम अली, मारुती चितमपल्ली यांचीही ही जंगले कायमच अभ्यासाचे केंद्र राहिली आहेत. पशुपक्षांच्या येथील सुरक्षित अधिवासा मुळे हे पर्यटन केंद्र जागतिक ख्याती प्राप्त झाली आहेत. राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यटन संकुलात वनाधिकाऱ्यासाठी निवासस्थाने बांधलेली आहेत. परंतु ही निवासस्थाने वापरात नसल्यामुळे नुसतेच रिकामे पडून आहेत. प्रत्येक विभागात अप डाउन ही संस्कृती निर्माण झाल्यामुळे ही निवासस्थाने रिकामी पडली आहेत. त्यामुळे जागतिक कीर्तीचे पक्षी तज्ञ व मराठी साहित्याला निसर्गाच्या समृद्धीने, मराठी साहित्याला समृद्ध करणारे मराठी भाषेला नावीन्यपूर्ण शब्दांचे दान देणारे थोर मराठी साहित्यिक व माजी वनाधिकारी मारुती चितमपल्ली मनोली नावाच्या या शासकीय निवासस्थानी राहत होते. त्यांनी वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ म्हणजे ३६ वर्षे नोकरी केली. नोकरीदरम्यान आणि त्यानंतरही अशी एकूण ६५ वर्षे जंगलात काढणारे चितमपल्ली, जंगलातील प्राणिजीवन आणि त्याचे बारकावे रेखाटणारे लेखन अतिशय ओघवत्या शैलीत करतात.

हे निवासस्थान सद्यस्थितीत रिकामे पडले आहे. त्या मुळे या ठिकाणी सुसज्ज वाचनालयाची निर्मिती करावी. अशी मागणी येथील स्थानिक व परिसरातील युवकांनी केली आहे.

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या युगात टिकून राहण्यासाठी दिवसेंदिवस वाढणाऱ्या बेरोजगारी-वर मात करण्यासाठी स्थानिक व परिसरातील युवकांना स्पर्धा परीक्षा देणे, त्याची तयारी करणे, यासाठी एका समृद्ध वाचनालयाची गावाला गरज आहे. नवेगावबांध सारख्या ग्रामीण व आदिवासी परिसरात युवकांना ही गरज पूर्ण करण्यासाठी सुसज्ज,परिपूर्ण अशा ग्रंथालयाची गरज भासत आहे. स्थानिक ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधींनी व शासनाने याकडे लक्ष द्यावे व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ञ मारुती चितमपल्ली यांच्या पावन स्पर्श लाभलेल्या मनोली या निवासस्थानी एक सुसज्ज वाचणालय निर्माण व्हावे. अशी अपेक्षा स्थानिक व परिसरातील युवकांनी व्यक्त केली आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी व लोप पावत चाललेली वाचन संस्कृती समृद्ध करण्यासाठी, बाहेरून येणाऱ्या पक्षी, प्राणी, वनस्पती, निसर्ग, जैवविविधता अभ्यासकांसाठी हे सुसज्ज असे वाचनालय निर्माण जर झाले, तर आपले स्वतःचे भविष्य घडवू पाहणारे, स्थानिक परिसरातील युवक, विद्यार्थी, निसर्ग अभ्यासक यांना राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यटन संकुलात निसर्गरम्य व शांत अनुकूल वातावरणात हे वाचनालय म्हणजे एक पर्वणीच ठरेल. यात तिळमात्र शंका नाही.स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन पुढारी व लोकप्रतिनिधी यांनी याकडे लक्ष देऊन उद्याच्या भविष्य घडविणाऱ्या युवकांना ही संधी प्राप्त करून द्यावी. अशी मागणी स्थानिक व परिसरातील युवकांनी केली आहे.

# डिजीटल स्वाक्षरीअभावी कागदपत्रांची कामे रखडली

**गोंदिया:** विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेशासाठी लागणाऱ्या कागदपत्रांवर दोन आठवड्यांपासून डिजिटल स्वाक्षरीच झाली नसल्याने विद्यार्थ्यांची कागदपत्रे गोरेगाव तहसील कार्यालयात रखडली आहेत. कागदपत्रांसाठी विद्यार्थी तहसील कार्यालयाच्या चकरा मारत असल्याचे चित्र आहे. विशेषतः गोरेगाव येथील तहसीलदार, नायब तहसीलदार यांच्या डिजिटल स्वाक्षऱ्या अद्ययावतच झाली नसल्याची बाब पुढे आली आहे. त्यातच कागदपत्रांअभावी विद्यार्थ्यांची कामे रेंगाळली असून प्रशासनाची चूक आता विद्यार्थ्यांच्या शिक्षणात बाधक ठरू लागली आहे.

गोरेगाव तहसील कार्यालयात चार नायब तहसीलदार नियुक्त आहेत. एका नायब तहसीलदारांचे स्थानांतरण करण्यात आले तर दुसऱ्या नायब तहसीलदारांना गोंदिया येथे प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे. १३ ऑगस्टपासून ही समस्या निर्माण झाली आहे. सेतू संबंधित अनेक कामे रेंगाळलेली आहेत. सध्या शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांना डोमेसिएल, उत्पन्नचा दाखला, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियल आदी प्रमाणपत्राची आवश्यकता असते. परंतु गोरेगाव येथील अधिकाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरी उपलब्ध नसल्यामुळे १३ ऑगस्टपासून त्यांचे कागदपत्र तहसील कार्यालयात अडून आहेत.

त्यामुळे विद्याथी चिंतेत सापडले आहेत. दररोज तहसील कार्यालयाच्या पायऱ्या झिजवताना दिसत आहेत. सद्यास्थितीत महाविद्यालयीन प्रवेशाच्या अंतिम तारखा जवळ आल्या असताना तहसील प्रशासनाकडून केवळ वेळ काढून नेत असल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची भीती निर्माण झाली आहे. तहसील प्रशासनाकडून डिजिटल स्वाक्षऱ्या अद्ययावत करणे गरजेचे असताना तशी प्रक्रिया वेळेत करण्यात आली नाही. परिणामी तहसील प्रशासनाची चूक आता विद्यार्थ्यांच्या शिक्षणात बाधक ठरली आहे.

विशेषतः गोरेगाव येथील तत्कालीन नायब तहसीलदार नरेश वेदी यांच्याकडे ही जबाबदारी सोपिवण्यात आली होती. वेदी यांची डिजिटल स्वाक्षरी अद्ययावत ही करण्यात आली होती. मात्र, त्यांचे सालेकसा येथे स्थानांतरण झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी होऊ शकली नाही. ही बाब तहसीलदारांच्या लक्षात आणून देण्यात आली. मात्र, स्वाक्षरीच्या तांत्रिक अडचणी दूर करण्यात प्रशासनाला यश आले नाही.




# प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अग्रेसर-माजी आ.जैन

**आमगावः**-आमगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्वपूर्ण बैठक सरस्वती विद्यालय बनगाव येथे माजी आमदार राजेंद्र जैन व जिल्हाध्यक्ष विजय शिवनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. सभेत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व पक्षबांधणी, पक्ष विस्तार व बुथकमेटी तयार करणे यावर चर्चा करण्यात आली. यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस हा जनसामान्यांचा पक्ष असुन सामान्य जनता, महिला, बेरोजगार यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पक्ष नेहमी प्रामाणिक प्रयत्न करीत असते. खासदार प्रफुल पटेल जी यांच्या नेतृत्वात जिल्हयाचा विकास करण्यासाठी आगामी सर्व निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र मिळून काम करावे. पक्ष संगठन मजबूत करण्यासाठी बुथ कमेटी चे सक्षक्तीकरण करणे आवश्यक आहे असे संबोधण्यात श्री जैन म्हणाले.



यावेळी बैठकीला सर्वश्री माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष विजय शिवणकर, नरेश माहेश्वरी, देवेन्द्रनाथ चौबे, टीकाराम मेंढे, कमलबापू बहेकार, अंजलि बिसेन, सुरेश हर्षे, राजेश भक्तवती, जियालाल पंधरे, देवेंद्र माछिरके, मुक्तानन्द पटले, चुन्नीलाल सहारे, पियूष झा, संतोष श्रीखंडे, सुभाष यावलकर, राजकुमार प्रतापगडे, बबलू बिसेन, संतोष वंजारी, बाबूलाल दोनोडे, नामदेव पागोटे, भारत पागोटे, प्रमोद शिवणकर, तीरथ येटरे, जयश्री पुड़कर, उषा हर्षे, संगीता दोनोडे, प्रमिला चकोले, शिला हजारे, रुपाली भक्तवती, अनुकला मड़ावी, सिमा शेंडे, संगीता ब्राह्मणकार, लक्ष्मी येडे, कमलेश्वरी भेलावे, सुधा शहारे, अनीता पटले,कांता रहिले, नामदेव दोनोडे, भोला गिरी महाराज, संजय रावत, प्रवीण गेडाम, मूलचंद गायधने, श्यामलाल पारधी, धनलाल मेंढे, प्रशांत कोरे, ईश्वर बिसेन, अजय उके, दीनदयाल गायधने, गोविन्द भंडारकर, श्रीराम चुटे, ललित ठाकुर, भास्कर बोरकर, मूलचंद बघेले, भाऊलाल बघेले, पुरुसोत्तम चुटे, मारुती राऊत, भोजराज सोनवाने, ओमकार सोनवाने, राजकुमार चौहान, धर्मा डोंगरे, प्रदुमन महारवाडे, प्रमोद माछिरके, बाबूराव ब्राह्मणकार, लखन भलावी, बाळाभाऊ महारवाडे, सुरेंद्र कोटांगले, राजकुमार मेंढे, मारुती मेश्राम, महेंद्र येडे, चंद्रकुमार बिसेन, फत्तु गाते, नरेश रक्षे, वामन कावडे, हुकूमभाऊ कोरे, यादोराव बिसेन यांचा सह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते .

# ग्रामविकास अधिकारी विना गावविकासाची कामे रखडली

अर्जुनी मोर-तालुक्यातील महागाव ग्रामपंचायतीमधे ग्रामविकास अधिकारी नसल्याने गावविकासासह ग्रामस्थांची कामे रखडली आहेत. महागाव ग्रापंमध्ये कायमस्वरूपी ग्रामविकास अधिकारी देण्याची मागणी महागांवचे सरपंचासह भाजपाचे वरीष्ठ नेते रामदास कोहाडकर यांनी केली आहे.

अर्जुनी मोर तालुकास्थळापासुन १५ किमी अंतरावरील महागाव ग्रापं १३ सदस्यीय आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार गावची लोकसंख्या ५४९६ तर कुटुंबसंख्या १३०८ आहे. तालुक्यात राजकीयदृष्ट्या महत्व प्राप्त असलेल्या या ग्रामपंचायतीवर भाजपा समर्थित गटाचे वर्चस्व आहे. लोकसंख्येनुसार महागाव ग्रामपंचायतीत ग्रामविकास अधिकारी पद मुजूर आहे. येथील ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी म्हणून हरडे कार्यरत होते. नोव्हेंबर २०२० हरडे निलंबित झाले. त्यानंतर विनोद श्रीवास्तव यांच्याकडे महागाव ग्रापंचा अतिरिक्त प्रभार देण्यात आला. मात्र श्रीवास्तव यांनी कोविडच्या कामात निष्काळजीपणा केल्याने तेही जून महिन्यात निलंबित झाले. तेव्हा पासून महागाव ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी नाही. गावची मिनीमंत्रालय असलेल्या महागाव ग्रामपंचायत सचिवाविनाच आहे. त्यामुळे गावविकासासह ग्रामस्थांची कामे थांबली आहेत. गावविकासाला गती येण्यासाठी महागाव ग्रापंमध्ये तत्काळ ग्रामविकास अधिकाऱ्याची नेमणूक करावी, असी मागणी ग्रापं पदाधिकारी, ग्रामस्थ यांनी केली आहे.




महागाव ग्रामपंचायतीचा प्रभार ग्रामसेवक हातझाडे यांच्याकडे देण्यात आला आहे. ग्रामसेवकाच्या आंदोलनामुळे हातझाडे यांना रुजु होण्यास विलंब झाला, लवकरच ते रुजु होणर असल्याचे गटविकास अधिकारी निमजे यांनी सांगीतले.

# बुद्ध विहार प्रकरणातील दोषींवर तात्काळ कारवाई करा,अन्यथा रस्त्यावर उतरू

**गोंदिया:** मागच्या बारा ऑगस्ट पासून गोंदिया तालुक्यातील मोरवाही येथे बुद्ध विहार तोडल्या संदर्भात न्याय मिळावा म्हणून बौद्ध समाज बांधवांचे धरणे आंदोलन सुरु आहे. यात समाज बांधवांकडून प्रशासनाला अनेक निवेदने तसेच पोलिसात तक्रार सुद्धा करण्यात आली. परंतु प्रशासनातर्फे अद्यापही दोर्षीवर कारवाई न झाल्याने येथील बौद्ध समाज बांधवांच्या भावना संतप्त झाल्या आहेत. दोर्षीवर तात्काळ कारवाई करून त्वरित नवीन बुद्ध विहार बांधून द्यावे, अन्यथा सर्व समाज बांधव रस्त्यावर उतरून आंदोलन करू,असा पवित्रा येथील बौद्ध समाज बांधवांनी शुक्रवारी (ता-३) मोरवाही येथे धरणे आंदोलन मंडपात घेतलेल्या पत्र परिषदेतून दिला आहे.

मागच्या दोन वर्षांपूवी पवन भागवत हेमणे,चंद्रभान मुन्नालाल ठाकूर, राजू श्रीपत ब्राह्मणकर नमक कंत्राटदारांनी शासनाकडून कोणतीही परवानगी न घेता यथास्थितीत असलेले जुने बुद्ध विहार नवीन बनवून देण्याच्या नावाखाली जमिनदोस्त केले. या प्रकरणाला दोन वर्षापेक्षा जास्त काळ लोटला तरी अजूनही या कंत्राटदारांनी नवीन बुद्ध विहार बांधून दिले नाही. त्यामुळे येथील बौद्ध समाज बांधवांना आपल्या धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी मोठी अडचण येत असून ते धार्मिक विधी पूर्ण करण्यापासून वंचित राहात आहेत.




## मोरवाही येथील बौद्ध समाज बांधवांची पत्रपरिषदेतून मागणी

दरम्यान ग्रामपंचायत प्रशासन व कनिष्ठ, कार्यकारी अभियंता जि.प. गोंदिया यांनी सदर बांधकामाची खोटी मोजमाप पुस्तिका सादर करून सदर बुद्ध विहार बांधकामासाठी आलेल्या शासकीय निधीची उचल करून अफरातफर केली आहे. असा आरोपही आंदोलनकर्त्यांनी लावला आहे. दरम्यान येथील बौद्ध समाज बांधवांनी या प्रकरणाची तक्रार शासन स्तरावर जिल्हा प्रशासनाकडे करून ग्रामपंचायत सरपंच,ग्रामसेवक,कनिष्ठ, कार्यकारी अभियंता व संबंधित तिन्ही कंत्राटदारांवर पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

पोलीस तक्रारीला आठ दिवसा पेक्षा जास्त काळ लोटला तरी अजूनही पोलीस प्रशासनाने या आरोपींची साधी चौकशी सुद्धा केली नाही. उलट पोलीस प्रशासन हे आंदोलनकारी बौद्ध समाजबांधवांची मानसिक पिळवणूक करीत असल्याचा आरोपही या समाज बांधवांनी लावला आहे.सदर कंत्राटदार हे जिल्ह्यातील चाबी संघटन पक्षाचे कार्यकर्ते असून त्यांचे आमदार विनोद अग्रवाल यांच्याशी जवळचे संबंध आहेत. त्यामुळे आमदार विनोद अग्रवाल यांच्या दबावाखाली जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासन दोषी व्यक्तींवर कारवाई करीत नाही. तसेच जिल्ह्यात एवढे मोठे आंदोलन सुरु असतानाही जिल्हाधिकारी महोदयांनी या आंदोलनाला साधी भेट देण्याचे सौजन्य ही दाखविले नाही.त्यामुळे या प्रकरणात मोठ्या प्रमाणात राजकीय दबाव येत असल्याचा आरोपही उपस्थित समाज बांधवांनी लावला आहे.

या आंदोलनाची तात्काळ दखल घेऊन दोषि ग्राम पंचायत सरपंच, ग्रामसेवक, कनिष्ठ,कार्यकारी अभियंता तसेच संबंधित कंत्राटदारांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कारवाई करावी तसेच त्वरित नवीन बुद्ध विहार बांधून देण्यात यावे,अन्यथा न्याय न मिळाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन तीव्र करू आणि जर या आंदोलनाचे पडसाद समाजात उमटले तर त्यास आम्ही जबाबदार राहणार नाही.

जिल्हा व पोलीस प्रशासन जबाबदार राहील असा इशाराही उपस्थित बौद्ध समाज बांधवांनी पत्रपरिषदेतुन दिला आहे. यावेळी पत्रपरिषदेत दिलीप मेश्राम, विजय मेश्राम, आशिष मेश्राम,राजकुमार मेश्राम, सचिन मेश्राम, अजय भालाधरे, रजनीकांत वैद्य, अर्चना भिमटे, सारिका मेश्राम, सुलोचना वैद्य, संगीता मेश्राम, शीला मेश्राम, शालीनी मेश्राम, माधुरी मेश्राम, अनिल मेश्राम, पंचम मेश्राम, कपिल रामटेके, पिंटू मेश्राम, उपस्थित होते.

# मलेरिया आणि डेंग्यूच्या प्रतिबंधासाठी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांकडून जनजागृती

**गोंदिया:-** शहरात डेंग्यू मलेरियाच्या प्रकरणांचे गांभीर्य पाहता, नागरिकांना माहिती देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वार्ड परिसरात घरोघरी जाऊन जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी प्रभाग परिसराच्या स्वच्छतेबाबत नगर-सेवक प्रतिनिधींची भेट घेतली, त्याला प्रतिनिधींकडून कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही.

गोंदिया शहरातील छोटा गोंदिया, गोविंदपूर, संजयनगर परिसर, विशेषत: छोटा गोंदियामध्ये गेल्या दीड महिन्यापासून डेंग्यू, मलेरिया रोगाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला आहे. वॉर्ड आवारात या आजाराचे रुग्ण वाढत आहेत. प्रत्येक घरात सदी, ताप आहे.

वृद्धांबरोबर तसेच मुले आणि तरुण या समस्येमुळे अधिक प्रभावित होत आहेत. छोटा गोंदिया परिसरात चार मुलांचा डेंग्यूमुळे मृत्यू झाला आहे. या परिसरात प्राणघातक डेंग्यूच्या डासांची संख्या वाढली आहे. या आजारामुळे अनेक रुग्णांना नागपुरात उपचार घ्यावे लागत आहे.




कोरोना महामारीनंतर विषाणूजन्य तापाने नागरिकांना ग्रासले होते, आता या वाढत्या गंभीर समस्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिगंबर कापसे, छायांकी भेलावे, लक्ष्मी मंडिये, जिज्ञासा शर्मा, मोहना राठोड, वैभव कोरे, अंजली शर्मा, अबोली बोरकर, अंजली मुरकुटे, अतुल चौहान, अंकुश बिशेन , खुशाली चौरीवार, कौशल लिल्हारे, करिश्मा भगत, ललिता लिल्हारे, जयश्री शेंद्रे, हिमांशू गोडसे, पलाश येरपुडे, ममता तुरकर, नेहा भोंडेकर, मोनाली पटले, पायल बोपचे, पायल रहांगडाले, प्राची चौधरी, प्रेरणा नागपुरे, प्रियंका नागरीकर, प्रगती खरे, सुभांशु कटरे, ट्विंकल बिसेन, शितल गणवीर, रितू शरणागत, योगांक्षी राघोर्ते, स्नेहा चौबे, शिया मुंडेले, सिमा पटले, जान्हवी सोनवाणे, श्रद्धा रामटेके, पुष्पराज गौतम, कुलदीप वैद्य, विक्रांत मुंडेले इत्यादींनी जनजागृतीचे प्रयत्न केले.

# आता महाज्योतीला हवे पूर्णवेळ अध्यक्ष

**नागपूर:** गेल्या दोन वर्षात महाज्योतीचे कारभार २०० किमी येथून हाकताना विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणी सोडविले जात नसल्याचे लक्षात येताच राज्य शासनाने गोंदिया येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असलेले प्रदीप डांगे यांची महाज्योतीचे पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केली. त्यामुळे महाज्योतीला आता पूर्णवेळ अध्यक्षाची मागणी होऊ लागली आहे.

८ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयाने महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योतीची) स्थापना करण्यात आली. त्यानुसार संस्थेसाठी संचालक मंडळावर संचालक म्हणून शासकीय आणि अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाते. महाज्योतीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत अनेकदा आर्थिक धोरणाविषयी ठराव आणले जाते. मात्र अध्यक्ष (मंत्री) आणि सदस्य सचिव (व्यवस्थापकीय संचालक) वारंवार अनुपस्थित राहत असल्याने त्याला मान्यता दिली जात नाही. यामुळे गेल्या दोन वर्षात विद्यार्थी हिताचे काम होत नसल्याने अध्यक्ष आणि एमडी यांच्या विरोधात विद्यार्थी, समाजातील लोकांचा आणि शासनातील बहुजन मंत्र्यांचाही नाराजीचा सुर वाढत गेला. २८ ऑगस्ट अगोदरपुर्वी फक्त चारच बैठका झाल्यात. त्याचा परिणाम हा महाज्योतीच्या कुठल्याच योजना प्रभावीपणे राबविता आल्या नाहीत. अखेर गेल्या आठवड्यात २८ ऑगस्टला संचालक मंडळाची पाचवी बैठक आयोजित करण्यात आली.

मात्र व्यवस्थापकीय संचालक डांगे यांच्या विरोधातही बहुजन

### प्रदीप डांगे पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक

सामाजिक संघटनांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार केली. तसेच डांगे यांच्याऐवजी पूर्णवेळ संचालक म्हणून योग्य व्यक्ती देण्याची मागणी केली. अखेर शासनाने आदेश काढून गोंदिया येथील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावरुन दूर सारत डांगे यांना महाज्योतीचे पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पहायला सांगण्यात आले आहे. तरी डांगे यांच्या कारभाराविरोधात सामाजिक संघटना आणि विद्यार्थ्यांमध्ये चांगलाच रोष आहे. सुत्रानुसार डांगे यांची महाज्योतीच्या व्यवस्थापकीय संचालक पदावरुन बदलीच होऊ नये म्हणून ना.वडेट्टीवार यांनी पूर्ण जोर लावला. त्याकरिता पूर्णपणे आपली प्रतिष्ठा लावली असल्याची चर्चा आहे. तसेच तीन पक्षाचे सरकार असल्याने डांगे यांना हटविता आले नसल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे संचालक मंडळातील काहींचा आशिर्वाद असल्याने त्यांना डांगे यांना एमडी पदावर कायम ठेवल्याचे आहे. तसेच तीन पक्षाचे सरकार असल्याने डांगे यांना हटविता आले नसल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे संचालक मंडळातील काहींचा आशिर्वाद असल्याने त्यांना डांगे यांना एमडी पदावर कायम ठेवल्याचे बोलले जाते. त्यामुळे आता पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक बनल्यानंतर डांगे आपला कारभार पूर्णपणे गतीवान करणार की यापुर्वीच्या प्रमाणे त्यांची कार्यशैली राहणार यावर सध्या सामाजिक संघटना आणि विद्यार्थ्यांसह अनेकांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली आहे. तर दुसरीकडे महाज्योतीची स्थापना इतर मागास बहुजन कल्याण विभागाने जोपर्यंत शासनाद्वारे अध्यक्षपदावर इतर कोणाची नियुक्ती होत नाही तोपर्यंत इतर मागास बहुजन कल्याणमंत्री हे पदसिद्ध अध्यक्ष राहतील अशी अट टाकली. ना. वडेट्टीवार मंत्री असल्याने कामाची व्यवस्ता अधिक असते. त्यामुळे त्यांनी योग्य व्यक्तीची पूर्णवेळ अध्यक्षपदी नेमणूक करावी अशी अपेक्षा केली जात आहे.

# बिरसी विमानतळाला मिळाला हवाई परवाना



**गोंदिया:** तालुक्यातील बहुप्रतीक्षित बिरसी विमानतळाला नागरी हवाई वाहतुक महासंचालनालयाचा परवाना मिळणार असून प्रवासी व मालवातुकीचा मार्ग सुकर होणार आहे. नुकतीच दिल्ली येथे खा.सुनिल मेंढे यांनी केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांची भेट घेत बिरसी विमानतळातील समस्यांवर चर्चा केली. विमानतळातील सर्व तांत्रिक समस्या लवकरच दूर सारून डीजीसीएचा परवाना मिळल्यानंतर प्रवासी व मालवातुक सुरू करण्याची ग्वाही सिंधिया यांनी दिल्याचे मेंढे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

बिरसी विमानतळाचे काम पुर्णत्वास आले आहे. मात्र याम काही तांत्रिक उणिवा असल्याने नागरी हवाई वाहतुक महासंचालनालयाचा परवाना मिळण्यास विलंब होत आहे. यासंदर्भात विमान प्राधिकरण समिती सदस्य तथा क्षेत्राचे खा. सुनिल मेंढे यांनी केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांची दिल्ली येथे भेट घेतली. बिरसी विमानतळातील समस्या, तांत्रिक उणिवांबद्दल चर्चा करून निवेदन दिले.

दरम्यान सिंधिया यांनी बिरसी विमानतळाला नागरी हवाई वाहतुक महासंचालनालयाचा परवाना मिळाल्यानंतर लवकरच प्रवासी आणि मालवाहू हवाई सेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले. याचा जिल्ह्यासह सिमावती मध्यप्रदेश, छतीसगड राज्यातील व्यापारी, प्रावश्यांना फायदा होणार आहे.

# लोंबकळलेल्या वीज तारांचे मृत्यूला आमंत्रण



**गोंदिया:** तालुक्यातील गुदमा, हेटीटोला, जनाटोला गावात वारंवार वीजपुरवठा खंडीत होत असल्याने येथील नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वीज विभागाच्या नाकर्तेपणामुळे विजेच्या खांबावरील तारा खाली लोंबकळत असल्याने येथे मोठी हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विद्युत विभागाने याकडे लक्ष देऊन वरील गावांत सुरळीत वीज पुरवठा करावा, लोंबकळत असलेले वीज तारांची दुरूस्ती करावी, अशी मागणी फिरोज बनसोड व गावकऱ्यांनी केली आहे.

राज्यातील महाविकास आघाडी सरकारने २०० युनिट पर्यंतची वीज माफ करण्याचे आश्वासनही दिले होते, परंतु ते आपल्या आश्वासनांपासून दूर गेले आहे. तसेच वीज विभाग एकीकडे वीज बिले न भरल्यामुळे वीज जोडण्या विनाविलंब कापल्या जात आहेत. ही हुकूमशाही आहे. त्यातच गुदमा, हेटीटोला, जनाटोला गावात वारंवार वीजपुरवठा खंडीत होत असल्याने येथील नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वीजपुरवठ्यामुळे गावात पाण्याची समस्या, मोबाईलमध्ये पुरेसे चार्जिंग नसल्यामुळे आभासी वर्गात शिकणाऱ्या मुलांचे होणारे नुकसान, दुकानदार व खासगी कार्यालयांना बसणारा फटका अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातच अनेक ठिकाणी वीजेच्या तारा लोंबकळत असल्याने नेहमीच जीविताची भीती राहते.

या समस्येबाबत ग्रामस्थांनी अनेक वेळा वीज विभागाला कळवले. परंतु आजपर्यंत वीज विभागाच्या एकाही अधिकाऱ्याने ही समस्या सोडवण्यासाठी हस्तक्षेप केलेला नाही. या समस्या त्वरीत निकाली न निघाल्यास वीज विभागाच्या कार्यालयावर धरणे आंदोलन करण्याचा इशारा आसली जिल्हा परिषदेचे जिल्हाप्रमुख फिरोज बनसोड व ग्रामस्थांनी दिला आहे.

# अनिल पाटील यांनी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा स्विकारला



**गोंदिया :** अनिल पाटील यांनी २ सप्टेंबर (मध्यानानंतर) रोजी गोंदिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार स्विकारला.

श्री अनिल पाटील यांचे शिक्षण एम.एस.सी. (ॲग्री.) (सुवर्ण पदक),एल.एल.बी. आहेत. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा अधिकारी वर्ग-२ म्हणून १९८९ ते १९९६ पर्यंत विविध पदांवर कामकाज केले. १९९६ पासून महसूल विभागात

परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी म्हणून रुजू. परिविक्षाधीन कालावधीनंतर ऑगस्ट १९९८ ते जुलै १९९९ पर्यंत सिंधुदुर्ग येथे जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून कार्यरत. जुलै १९९९ ते मे २००३ पर्यंत अलिबाग येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत. मे २००३ ते जुलै २००८ पर्यंत उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी म्हणून नागरी जमीन कमाल धारणा (मुंबई) कार्यालयात कार्यरत. मार्च २००८ ते मे २०११ पर्यंत मुंबई येथे उपनियंत्रक शिधावाटप पदावर कार्यरत. यावेळी शिधापत्रिका नमुने ऑनलाईन उपलब्ध करुन लोकांना होणारा त्रास कमी करण्याचा प्रयत्न केला. सप्टेंबर २०११ ते जुलै २०१६ पर्यंत सिडको महामंडळात प्रतिनियुक्ती. यावेळी नवी मुंबई व सिडको मालकीचे अतिक्रमीत भूखंडावरील अतिक्रमणे निष्कासनाचे कामकाज व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादीत करावयाच्या जमिनीची

भूधारकांच्या संमतीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण केली. जुलै २०१६ पासून पदोन्नतीवर अप्पर जिल्हाधिकारी नंदूरबार या पदावर जानेवारी २०१८ पर्यंत कामकाज. जानेवारी २०१८ पासून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मुंबई तसेच व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मुंबई येथे ३० ऑगस्ट पर्यंत कामकाज.




## जुगाऱ्यांसह ४ लाखाचा मुद्देमाल जप्त

**अर्जुनी मोरगाव :** गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वन विभागाच्या कार्यालयासमोरील एका इमारतीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड मारली. या धाडीत पोलिसांनी एकूण ३ लाख ९९ हजारांचा मुद्देमालासह ६ आरोपींना अटक केली. यात प्रजेश अशोक कोरे (२७), मंगेश मारूती हरने (३४), राकेश आत्माराम डोंगरवार (३५), लोकेश उमेश क्षीरसागर (२६) व बोंडगांवदेवी येथील रहिवासी विर्शाम शंकर रामटेके (४२), विकास रामप्रसाद बरैया (३६) यांना अटक केली.

# सौरउर्जा प्रकल्पासाठी ४० टक्के अनुदान

**गोंदिया:** महावितरणच्या घरगुती वर्गवारीतील ग्राहकांसाठी (घरगुती गृहनिर्माण रहिवासी संस्था व निवासी कल्याणकारी संघटना) छतावरील (रुफटॉप) सौर उर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळणार आहे. सौर उर्जा निर्मिती यंत्रणेमुळे मासिक घरगुती वीज बिलात मोठी बचत होणार आहे. नेटमिटरिंगद्वारे महावितरणकडून वर्षाअखेर शिल्लक वीज देखील विकत घेतली जाणार आहे.



केंद्र शासनाच्या नवीन व नवीनीकरणीय उर्जा मंत्रालयाच्या रुफटॉप सौर योजना टप्पा दोन अंतर्गत महावितरणसाठी २५ मेगावॅटचे उद्दीष्ट मंजूर झाले आहे. या योजनेमधून घरगुती वर्गवारीतील ग्राहकांना किमान एक किलोवॅट क्षमतेची छतावरील (रुफटॉप) सौर उर्जा निर्मिती यंत्र बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून वित्त सहाय्य देण्यात येणार आहे. यात घरगुती ग्राहकांसाठी १ ते ३ किलोवॅटपर्यंत ४० टक्के आणि ३ किलोवॅटपेक्षा अधिक ते १० किलोवॅटपर्यंत २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. तसेच सामूहिक वापरासाठी ५०० किलोवॅटपर्यंत परंतु प्रत्येक घरासाठी २० किलोवॅट मर्यादेसह गृहनिर्माण रहिवासी संस्था व निवासी कल्याणकारी संघटना ग्राहकांना २० टक्के अनुदान मिळणार आहे. महावितरणने रूफटॉप सौर उर्जा निर्मिती यंत्रणा आस्थापित करण्यासाठी परिमंडळनिहाय एजन्सीची नियुक्ती केली आहे. त्याची यादी व ऑनलाईन अर्जाची सोय महावितरणच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. पाच वर्षाच्या देखभाल खर्चासह रुफटॉप सौर उर्जा निर्मिती यंत्रणेसाठी १ किलोवॅट-४६८२०, १ ते २ किलोवॅटसाठी ४२ हजार ४७०, २ ते ३ किलोवॅटसाठी ४१ हजार ३८०, ३ ते १० किलोवॅटसाठी ४० हजार २९० तसेच १० ते १०० किलोवॅटसाठी ३७ हजार २० रुपये प्रतिकिलोवॅट किंमत जाहीर करण्यात आली आहे.

## जुगार खेळणाऱ्या १५ आरोपींना अटक

**देवरी :** देवरी पोलिस ठाण्यांतर्गत परसटोला येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड मारून एकूण ७ हजार ४५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. तसेच घटनास्थळावरून ८ आरोपींना अटक केली. यात गजानन सार्वे, (२२), अमोल बडोले (२५), नितेश कोहरे (३२), बबलु मेर्शाम, अनिल नेताम, विजय मेर्शाम, अनिल क्षिरसाम, आसु ठाकरे, तेजू मेर्शाम, रोहित भोयर, जापान मडावी यांचा समावेश आहे. तर दुसऱ्या घटनेत जुगार अड्ड्यावर धाड मारून पोलिसांनी १२ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. घटनास्थळावरून पोलिसांनी विनोद सरोजकर, हितेश सोनेवाने व महेश नागदेवे तिन्ही रा. देवरी यांना अटक केली. असे एकूण दोन जुगार अड्ड्याच्या छापामार कारवाईत एकूण १५ आरोपींना अटक करून १९ हजार ९५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

# सेजगाव येथे सिमेंट रस्ता बांधकामाचे भुमिपूजन




**तिरोडा :** तालुक्यातील सेजगाव येथे २५१५ मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकामाचे भूमि पूजन ४ सप्टेंबर रोजी आ.विजय रहांगडाले आमदार यांच्या करण्यात आले.

कार्यक्रमाला सरपंच के.के. पारधी, माजी उपसभापती किशोरजी पारधी, उपसरपंच स्वप्निल महाजन, जि.प.चे माजी सभापती मदनभाऊ पटले, भाजयुमोचे उपाध्यक्ष गौरीशंकर पारधी, ग्रा.पं.सदस्य मनीषा बावनकर, ग्रामसेवक डी.आर.तुरकर, सेवानिवृत्त कृषी सहाय्यक सुरज पारधी, डॉ. बसंत भगत, पवण पटले, राधेकिशन शरणागत, अॅड.युसुफ शेख, नेतलाल मालाधारी, गिरजाशंकर बिसेन सर्व ग्राम पंचायत सदस्य व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी आ.विजय रहांगडाले यांच्या हस्ते सिमेंट रस्ता बांधकामाचे भुमिपूजन करण्यात आले. यावेळी सेजगाव येथील नागरिक उपस्थित होते.

# आरोग्य सेवेत दाखल होणार २५ रुग्णवाहिका



**गोंदिया:** रुग्णांना वेळेवर रुग्णालयात दाखल करता यावे, त्यांचा मृत्यू होऊ नये या उद्देशाने आरोग्य विभागाने आरोग्यसेवा सबळ करण्यासाठी पाऊल उचलले आहे. आरोग्यसेवा आयुक्तालयाने राज्यासाठी ४६३ रुग्णवाहिका खरेदी केल्या आहेत पैकी २५ रुग्णवाहिका गोंदिया जिल्ह्याचा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल होणार आहेत. विशेष म्हणजे या रुग्णवाहिका १०२ या गरोदर माता, प्रसूत माता, नवजात शिशुंच्या आरोग्य सेवेसाठी कार्यरत होणार आहेत.

गोंदिया जिल्हा दुर्गम, आदिवासी, जंगल व्याप्त म्हणून ओळखला जातो. आजही जिल्ह्यातील अनेक गावांत आरोग्याच्या भौतिक सोयी-सुविधा पोहोचल्या नाहीत. कोरोना संसर्ग काळात भौतिक सोयी, सुविधांअभावी रुग्णांची चांगलीच गैरसोय झाल्याचे पहावयास मिळाले.

वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने अनेकदा रुग्णांचा जीवही जातो. ग्रामीण आरोग्य यंत्रणा सुदृढ, सबळ व्हावी या दृष्टिकोनातून राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने ४६३ रुग्णवाहिका खरेदी केल्या आहेत. गोंदिया जिल्ह्याला सर्वाधिक २५, भंडारा ८, गडचिरोली १२, चंद्रपूर २०, अकोला २, अमरावती ४, बुलढाणा २१, वर्धा व वाशिम जिल्ह्यासाठी प्रत्येकी ३ अशा विदर्भातील दहा जिल्ह्यांत ८८ रुग्णवाहिका दाखल होणार आहेत.

**या आरोग्य केंद्रांना मिळणार रुग्णवाहिका**

जिल्ह्याच्या आरोग्य सेवेत दाखल होणाऱ्या रुग्णवाहिका या गोंदिया तालुक्यातील भानपुर, दवनीवाडा, एकोडी, खमारी, मोरवाही. सालेकसा तालुक्यातील बिजेपर, दरेकसा, काबराबांध, सातगाव. आमगाव तालुक्यातील बनगाव, खमारी. अर्जुनी मोर तालुक्यातील चान्ना बाक्टी, गोठणगाव, केशोरी, कोरंभीटोला, धाबेपावनी. देवरी तालुक्यातील फुटाणा, घानोडी, ककोडी. गोरेगाव तालुक्यातील कवलेवाडा, सोनी, तिल्ली मोहगाव. सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा, पांढरी या प्राथमिक आरोग्य केंद्रांचा समावेश आहे. उल्लेखनीय म्हणजे तिरोडा तालुक्यातील एकाही आरोग्य केंद्राचा यात समावेश नाही.

## महाराष्ट्र राज्य बृद्धीबळ संघटनेच्या अध्यक्षपदी आमदार फुके

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या निवडणुकीत आ. परिणय फुके यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेची आभासी बैठक येथील हॉटेल ग्रेड सीता येथे घेण्यात आली. बैठकीला आ. फुके, गोंदिया जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव मुकेश बाराई यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



प्रसंगी फुके यांची राज्य बुद्धीबळ संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गोंदिया बुद्धिबळ आणि क्रिकेट संघटनेचे पदाधिकारी राजू लिमये, नियाज शेख, प्रभाकरो पालांदुकर, शिखा पिपेलवार, सुधांशु गायधने आदींनी फुके यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे संरक्षक आणि पदाधिकारी रवि आर्य, अयज गौर, दिपम पटेल, दिलीप जैन, भावना दीपक कदम, राजेंद्र रमाणी, संतोष शर्मा, डॉ. नितीन कोतवाल, डॉ. अमित जैस्वाल, डॉ. गौरव अग्रवाल, डॉ. कोमल अग्रवाल, शिशिर अग्रवाल, नरसिंग गहरवार, किशोर उपाध्याय, विवेक रामटेके, शुभम जैयसवाल, मयूर गुप्ता यांनी शुभेच्छा दिल्या.

# महामार्गाच्या अर्धवट कामामुळे शहरवासी त्रस्त



**गोरेगाव:** गोंदिया-गोरेगाव राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाकरिता कंत्राटदाराने ठिकठिकाणी रस्ता खोदून ठेवल्याने नागरिकांसह विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. व्यापारीवर्गही त्यामुळे त्रासले असून शहरातील व्यापारी व जनतेच्या ऑनलाइन मिळालेल्या निवेदनाची दखल घेत माजी नगराध्यक्ष इंजि. आशिष बारेवार यांनी राष्ट्रीय महामार्ग नागपूर विभागाचे कनिष्ठ अभियंता इंजि. दीपक चव्हाण यांच्याशी चर्चा केली. शहरातून जाणाऱ्या महामार्गाचे अपूर्ण बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करा व नागरिकांना होणारा समस्यांचे निवेदन दिले. शहरातील पंचायत समिती कार्यालय ते दुर्गा चौक, ठाणा चौकापर्यंत महामार्गाचे अर्धवट काम करण्यात आले असून सदर महिनभरापासून बांधकाम बंद पडून आहे. त्यामुळे या अर्धवट बांधकामामुळे स्थानिक नागरिकांना ये-जा करण्यास मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या महामार्गाच्या अर्धवट कामामुळे रहदारीस अडथडा होत असून अनेक अपघातही घडत आहेत. येथील व्यावसायिकांची प्रतिष्ठाने ठप्प पडली आहे. पार्किंग व्यवस्थावरही मोठा परिणाम पडला असून नागरिकांना त्रास होत आहे. येथे दरदिवशी ट्राफीकची ही समस्या निर्माण झाली असून वाहनधारकांना रांगेत उभे राहावे लागत आहे. ज्यामुळे नागरिकांना खरेदी करण्यास त्रास होत आहे. बस व कालीपिवळीमध्ये प्रवाशी वाहून नेणाऱ्या वाहनधारकांना समस्या होत असून बस स्थानक न असल्यामुळे प्रवाशांना उन्हात उभे राहावे लागते. परंतु जगताप कन्स्ट्रक्शन कंपनीला नागरिकांना होणाऱ्या समस्याशी काहीही पर्वा नसून ते बांधकाम पूर्ण करत नाही.

या सर्व समस्यांचा निराकरण लकवकरात लवकर करण्यात यावे. महामार्गाचे बांधकाम त्वरित पूर्ण करण्यात यावे, यासंबंधी माजी नगराध्यक्ष आशीष बारेवार यांनी राष्ट्रीय महामार्ग अभियंता दीपक चव्हाण यांची भेट घेऊन चर्चा केली व महामार्गाचे काम त्वरित पूर्ण करा अशा मागणीचे निवेदन बारेवार यांनी दिले.

# हॉकर्स झोनचा विषय रेंगाळला




**गोंदिया:** शहरातील फेरीवाल्यांना त्यांच्या हक्काची जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शहरातील दुकानांचे सर्वेक्षण करण्यात आले. नगर पालिकेसमोर असलेल्या बाजारातील जागेत चार मजली इमारत तयार करुन त्याठिकाणी हॉकर्स झोन तयार करण्यात येणार होते. मात्र वर्षभराचा कालावधी लोटून देखील त्यावर कारवाई झाली नाही. बाजार उठविण्याला विरोध होत असून मतांचे राजकारण बिघडू नये, यासाठी हा विषय रेंगाळत ठेवला असल्याची चर्चा सुरु झाली आहे.

गोंदिया शहरात मिळेल त्या ठिकाणी टपऱ्या आणि इतर दुकाने टाकून व्यवसाय करणाऱ्यांची मोठी संख्या आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथडा निर्माण होतो. यावर उपाययोजना म्हणून शहरातील दुकानांचे सर्वेक्षण करुन त्यांना स्थायी स्वरुपात दुकाने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वेक्षणाकरिता शासनाने नगर पलिकेला १ लाख ९० हजार रुपयांचा निधी मंजूर केला. शासनाच्या या योजनेंतर्गत फेरीवाल्यांकरिता हॉकर्स झोन तयार करण्यात येणार असून त्याकरिता उपाययोजनांना सुरुवात करण्यात आली. वर्षभरापुर्वी ऑनलाईन सर्वेक्षण देखील करण्यात आले. सर्वेक्षणाचे काम एका संस्थेला देण्यात आले. सर्वेक्षणाच्या आधारे फेरीवाल्यांची यादी तयार केली जाणार असून या यादीत ज्या फेरीवाल्यांचा समावेश असेल अशांना हॉकर्सझोन मध्ये दुकान उपलब्ध करुन दिले जाणार होते. हे काम अधिक प्रभावीपणे व्हावे, या उद्देशाने अस्थायी कमिटीची स्थापना करण्यात आली. या कमिटीत शहरातील विविध भागातील नागरिकांना प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. हॉकर्स झोनकरिता दुकाने देण्यात येणार असून त्याकरिता फेरीवाल्यांना रक्कम जमा करावी लागणार आहे. फेरीवाले शहरातील गल्ली बोळात जावून साहित्याची विक्री करतात. मात्र त्यांना आता एकाच ठिकाणी स्थायी दुकान थाटून साहित्याची विक्री करावी लागणार आहे.

# परदेशी शिष्यवृत्तीच्या नोंदणीसाठी अडचण

## ओबीसी विद्यार्थ्यांवर अन्याय, ऑफलाइन अर्ज करण्याचा सल्ला

**नागपूर:** परदेशातील सामाजिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यासाठी राज्य सरकारच्या इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाकडून विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केल्या जाते. सध्या त्यासाठी सामाजिक न्याय विभागांच्या संकेतस्थळावर नोंदणी करावयाची आहे. मात्र ती नोंदणीसाठी अवघे तीन दिवस ठरले असतानाही विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होत आहे.

राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या गुणवंत १० मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते.

त्यासाठी जुलै महिन्यांपासून नोंदणीस सुरुवात करण्यात आली आहे. मात्र विद्यार्थ्यांना त्यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि इतर बाबी करण्यासाठी बराच वेळ जातो. त्यामुळे १ ऑगस्टपर्यंत असलेली मुदत वाढवून ३१ ऑगस्टपर्यंत करण्यात आली.

असे असताना महाराष्ट्राच्या संकेतस्थळावर त्यासाठी नोंदणी करण्याचा प्रयत्न विद्यार्थी करीत असतात ते संकेतस्थळातील अर्जच भरता येत नसल्याची बाब समोर आली आहे. याबाबत विचारणा करण्यासाठी संकेतस्थळावर देण्यात आलेल्या कक्ष अधिकारी अमित जगताप यांना विद्यार्थ्यांनी संपर्क केला असता ते काम माझ्याकडे नसल्याचे सांगतात. याशिवाय इतर अधिकाऱ्यांना संपर्क केला असता ते पुण्यात येऊन ऑफलाइन अर्ज करा असा सल्ला देतांना दिसून येतात.

### ओबीसी मंत्रालयाचे संकेतस्थळ नाहीच

**तीन वर्षापुर्वी राज्य सरकारद्वारे ओबीसी मंत्रालय स्थापन करण्यात आले. मात्र अद्याप मंत्रालयाचे स्वत:चे स्वतंत्र संकेतस्थळ नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्यासाठी असलेल्या योजना आणि उपक्रमांची माहिती मिळत नाही. मात्र मंत्रालयाचे माजी प्रधान सचिव जगदीशप्रकाश गुप्ता हे अद्यापही मंत्रालय नवीन असल्याचे सांगतात. या विभागाचा अतिरिक्त कार्यभार इंद्रा मालो यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.**

**विद्यार्थ्यांना माहितीसाठी मंत्रालय आणि आयोगाचे स्वतंत्र संकेतस्थळ असणे आवश्यक आहे. राज्यसरकारने शिष्यवृत्तीच्या विद्यार्थ्यांना नोंदणीसाठी विशेष संकेतस्थळ उपलब्ध करुन द्यावे.**

**उमेश कोर्राम, स्टुडंट्स राईट्स असोसिएशन.**